१५३

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ९२२८

REFBK-0008084
REFBK-0008084



प्रकाशन ९४ वें

# छायाप्रकाश

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
सं. नं.
स्थळ प्रत

लेखिका

**सौ. आनंदीबाई लेले**

REFBK-0008084
REFBK-0008084

किंमत दोन रुपये

१९५३

— प्रकाशक —
पंडित अनंत कुलकर्णी
कु ल क र्णी ग्रं था गा र
१८६ शनवार, पुणें २.

— मुखपृष्ठ —
चित्रकार पेडणेकर

सर्व हक्क
लेखिकेचे स्वाधीन

— मुद्रक —
बा. भा. जोशी
ज्ञा न वि ला स प्रे स
२७ बुधवार, पुणें २.

## कवितानुक्रम


| | | | |
|---|---|---|---|
| १. छाया-प्रकाश ... | ९ | २३. सदय ह्मणि धांवे .. | ३१ |
| २. बंधनाविणें ... | १० | २४ सद्गुरुनाम वद .. | ३२ |
| ३. प्रभु अवघा भरला .. | ११ | २५. उठुनी प्रभातीं कवणाचे | ३३ |
| ४. हृदयमंदिरीं असून .. | १२ | २६. उठि आत्मारामा ... | ३४ |
| ५. विसरुनि क्षण भवजाल | १३ | २७. करिं दिधली प्रिय ... | ३५ |
| ६. भेट ह्मणीं माधवा ... | १४ | २८. अभिनव मंगलाष्टकें ... | ३६ |
| ७. मुरली .. | १५ | २९. प्रिय तुजला कां .. | ३८ |
| ८. कृष्णाची दृष्ट .. | १६ | ३०. आरती वटसावित्रीची... | ३९ |
| ९. कालियामर्दन ... | १७ | ३१. आरती हरितालिकेची.. | ४० |
| १०. जीवनज्योत .. | १८ | ३२. आरती सद्गुरूची .. | ४२ |
| ११. शारदास्तवन .. | १९ | ३३. जय जय जय .. | ४३ |
| १२. निलगिरी ... | २० | ३४. कृष्ण सगुण स्वरूप .. | ४४ |
| १३. वनवासास निघालेला.. | २१ | ३५. हे दयाघना तारी .. | ४५ |
| १४. व्रजनारी यशोदा संवाद. | २२ | ३६. कां बोलसी न .... | ४६ |
| १५. हा रवींद्र, हा कवींद्र... | २३ | ३७. ज्ञानेश्वरी अमृतघट ... | ४७ |
| १६. नूतन आदर्श महिला... | २४ | ३८. दाखवील सुपथ तुला ... | ४८ |
| १७. नवविवाहित आदर्श ... | २५ | ३९. श्रीरंगा कोमलांगा .. | ४९ |
| १८. स्तब्ध उभी राहिली .. | २६ | ४०. प्रभुवर देऊं मी काय .. | ५० |
| १९. येत कैलासीं, हरिहरासी.. | २७ | ४१. चि. पद्मास ... | ५१ |
| २०. या मृदु सुमनशय्येप्रती .. | २८ | ४२. कीर्तीस .. | ५२ |
| २१. शाश्वत नाहीं काया .. | २९ | ४३. हांस जरा तूं ... | ५३ |
| २२. संताविण त्रिजगीं .. | ३० | ४४. करि बाळे जो जो ... | ५४ |

४५. बांसरी तव .. ५५
४६. धिःकार उर्दारि तव .. ५६
४७. तो जीविचा विसावा ... ५७
४८. हा दीनानाथ .. ५८
४९. अज्ञान निशेच्या ठायीं ... ५९
५०. सहचारिणी जणुं .. ६०
५१. वासंतिक समय गोड ... ६१
५२. शिव पार्वती संवाद ... ६२
५३. प्रेमें वद विष्णुप्रति ... ६३
५४. विमल करि मन ... ६५
५५. अजि भाग्य माझें ... ६६
५६. धरि मनीं ... ६७
५७. सद्‌गुरुनाथ ... ६८
५८. सकल योगाहुनी ... ६९
५९. जो जो रे जो जो .. ७०
६०. तूं वद रसने वेगें .. ७१
६१. हरि वाजवी ... ७२
६२. होळी ... ७३
६३. भिल्लीण वेषधारी .. ७४
६४. गौळण .. ७५
६५. शबरी ... ७६
६६. प्रभुजी मी खचित .. ७७
६७. कृष्णसत्यभामा संवाद ... ७८
६८. मुरली .. ७९
६९. कृष्णक्रीडा ... ८०
७०. प्रभुजी मानु किती .. ८१
७१. सहज आलें रम्य काननाला ८२
७२. सावित्री .. ८३
७३. विश्वजननी श्री भवानी ८७
७४. कशास्तव रचिल्या मी ८८
७५. म्हणुनि मी त्यजितें ... ९१
७६. हरिकीर्तनीं नाहीं प्रीति ९२
७७. उठि गोपाला .. ९३
७८. वनवास सुखें ... ९४
७९. वृंदावनीं हरि वाजवी .. ९५
८०. हे सुभाष तव सू-भाष .. ९६
८१. तेथें मी वसतें ... ९७
८२. शरण कुणा जाऊं .. ९८
८३. भूषवी गगन चंद्रमा .. ९९
८४. प्रभुला वाहूं करुनि .. १००
८५. मोहनमाळ कशाला .. १०१

दा. क. ८०८४
संग्रह शाखा (स्थळ

श्री

# प्रस्तावना

बाळपणीं मनावर होणारे संस्कार कसे चिरस्थायी असतात, त्याचें प्रत्यंतर म्हणजेच हा माझा कवितासंग्रह " छायाप्रकाश. " मनुष्याची फार दिवसांची मनिषा पूर्ण झाल्यावर जो एक प्रकारचा सात्त्विक आनंद होत असतो त्याचाच अनुभव, आज मी हा कवितासंग्रह वाचकांचे हातीं देतांना उपभोगीत आहें, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

माझे वडील मी तीनचार वर्षांची असतांनाच परलोकवासी झाले. त्या वेळीं माझी आई त्या दुःखद प्रसंगाचा थोडातरी विसर पडावा म्हणून, भक्तिविजय, पांडवप्रताप, शिवलीलामृत वगैरेसारखे ग्रंथ वाचीत असे व मीही तिच्या आंवतींभंवतींच असल्यामुळें मलाही त्यांचें श्रवण घडत असे.

त्यामुळें असो किंवा उपजतच एखाद्यांत कवित्वशक्ति असते म्हणून म्हणा, मलाहि आपण कांहीं तरी गाणें करावें असें वाटे.

मी माझे सातवे आठवे वर्षीं एक पद केलें होतें. तें मला अजूनही पाठ आहे म्हटलें तरी चालेल. त्या वेळीं मला नुकतेंच लिहितां वाचतां येत असेल असें वाटतें.

तें पद विश्वामित्र ऋषी राजा दशरथाकडे आपल्या यज्ञाचें रक्षण करणें-करितां श्रीरामचंद्रास आपलेबरोबर पाठव असें सांगण्यास आल्यावेळचें आहे. तें खालीलप्रमाणें–

परिसतांचि मुनिवाक्याला । नृप दशरथ बहु घाबरला ॥ ध्रु. ॥
राम दिसे हा सानवयी जरी । रक्षिल माझ्या यज्ञाला ॥ परि० १ ॥
नृपति म्हणे, ही सेना नेई । नको नेऊं माझ्या रामाला ॥ परि० २ ॥
राजकुमारा नेतो तरी मी । सुखरूप पोंचविन मी याला ॥ परि० ३ ॥
रामलक्ष्मण संगें देउनि । बोळवि विश्वामित्राला ॥ परि० ४ ॥

पदाचे शेवटीं आपलें नांव घालणेची प्रथा त्या वेळीं होती; पण यानंतरच्या पदांतून " गोपालसुता " असें मी माझें नांव घालूं लागलें.

त्या त्या वेळच्या चळवळींवरही मीं बरींच पदें लिहिलीं. कै. लोकमान्य बा. गं. टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त लिहिलेली कविता, " हिंदमातेचा शोक" प्रथमच लोकमान्य वर्तमानपत्रांत छापून प्रसिद्ध झाली व त्याच दिवशीं माझी मुलगी चि. लीला कांहीं दिवसांचे दुखण्यानें परलोकवासी झाली.किती

विचित्र योगायोग ! मला अजूनही आठवतें, कीं ती कविता मी लोकमान्याला पाठविणेंकरितां लिहीत असतां मनांत एकदम विचार येऊन गेला –हिंदमातेचा शोक ही कविता मीं लिहिली. पण न जाणो, उद्यां माझेवरच हा प्रसंग नाहीं ना येणार ? आणि तेंच खरें झालें. होणारें मनांत येतें म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. असा 'प्रथमग्रासे मक्षिकापात' झाल्यानें कविता छापावी हा विचार मनांत येतांच, पुढील दुःखद प्रसंगही चित्ररूपानें मनांत उभा राही. त्यामुळें कविता छापून प्रसिद्ध करण्याचा नाद जवळ जवळ सुटलाच म्हटलें तरी चालेल.

मीं वेळोवेळीं लिहिलेलीं पदें मात्र नीट वहींत टिपून ठेवीत असे. माझे चुलते ती. विष्णुपंत किल्लेदार व त्यांच्या पत्नी रमाबाई यांनाहि गाण्याचा नाद असलेमुळें, ' रंगु, तुझें एकादें कृष्णाचें पद म्हण पाहूं ' असें त्यांनीं म्हणावें व रात्रीं निजण्यापूर्वीं एकदोन पदें म्हटल्यावरच सर्वांनीं झोंपी जावें असा क्रम नेहमीं चाले. अर्थात् मी तेथें असल्यावेळीं हें सांगणें नकोच.

मलाहि जात्याच गाण्याची आवड व गळाहि चांगला असलेमुळें नेहमीं म्हणण्याबद्दल आग्रह होत असे. त्यामुळेंच काव्याची आवड कायम राहिली असें वाटतें.

तसेंच माझ्या चुलत सासूबाई ( कै. गोपाळ ग. आगरकर यांच्या चुलत भगिनी ) हा माझा उपजत छंद वाढविण्यास कारणीभूत झाल्या म्हणण्यास हरकत नाहीं. त्यांनीं माझेजवळ असल्यावेळीं तरी रोज दोनचार पदें म्हणून घेतलीं नाहींत, असें कधींच झालें नाहीं. कथापुराणांतून अगर अध्यात्मविषयावर जरी त्यांनीं चांगलें ऐकलें, वाचलें तरी तें पत्रांतून लिहून मला पाठवीत व यावर तूं कविता, पद कर असें लिहीत.

त्यांच्याच लिहिण्यावरून केलेलीं पदें म्हणजे संतमहिमा, श्रीमद्शंकराचार्यांची गस्त, हरिहरभेट वगैरे. त्या आज हयात नाहींत. आजचा हा कवितासंग्रह पाहून त्यांनाही अत्यंत आनंद झाला असता. असो.

१९२८ साल असेल. मी एकदां माहेरपणाकरितां, सांगलीस असतां, माझे चुलतबंधू श्री. गंगाधरपंत किल्लेदार मला सहज म्हणाले, "ताई, तूं जीं हीं लहान लहान पदें करतेस, त्यापेक्षां एकादें मोठें काव्य कां करत नाहींस?" आणि याच विचारसरणींतून माझ्या 'सुबोध गंगालहरीचा' जन्म झाला. याच वेळीं आमच्या समोरच्या जुन्या मुरलीधराचे देवळांत एक नाशिककडचे

सं. ग्रं. काव्य ९३२९

शास्त्रीबोवा कवी जगन्नाथपंडित यांच्या गंगालहरीवर सुश्राव्य प्रवचन करीत होते. काव्य आधींच अतिशय सुंदर व माझ्या चुलत्यांनीं मला लहानपणीं गंगालहरींचे कांहीं श्लोक शिकविले असलेमुळें, त्यावरच मराठी श्लोक करणेचें ठरलें.

माझे बंधूंचें संस्कृत चांगलें असल्यामुळें त्यांनीं मूळश्लोकांचें मराठी भाषांतर करुन घ्यावें व त्यावर मीं श्लोक करावा असे ५२ श्लोक मी तेथें असतांना एक महिन्याचे अवधींत केले व 'सुबोध गंगालहरी' हें नांव देऊन १९२९ ला मनाचा अगदीं निर्धार करून छापून प्रसिद्ध केले. माझे बंधूचे मित्र श्री. वाडेकर यांनींही मला या कामीं बरेंच सहाय्य केलें.

तसेंच पुस्तक छापण्यापूर्वी श्रीमंत राजेसाहेब औन्ध व श्रीमंत बाबासाहेब इचलकरंजीकर या थोर व्यक्तींनीं उपयुक्त सूचना दिल्या व माझ्या या छोटया कृतीचा गौरवपूर्ण उल्लेख केला. तसेंच केसरीनेंही चांगला अभिप्राय दिला.

यानंतर म्हणजे १९३८ ची गोष्ट. मी दुखण्यानें अगदीं अंथरुणावरच होतें. ते दिवस नवरात्राचे असल्यामुळें, मुली रोज अंगणांत हदगा खेळत व नेहमींचीं गाणीं 'एक लिंबू झेलूं बाई' 'काळा कोळसा झिगझिग वाणा' वगैरे गाणीं म्हणत. मीही लहानपणीं हींच गाणीं म्हटलीं. पण मला कळूं लागल्यापासून वाटे कीं, हीं अर्थहीन गाणीं म्हणण्यापेक्षां त्याच म्हणजे गजगौरीचे आख्यानावर पदें करावीं आणि सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे मी आजारीपणांतील रिकामपणांत, पूर्वींच्या चालीवर सोळा पदें केलीं. हेतू हा कीं, मुलींना म्हणण्यासही तीं सोपीं जावीं. आमच्या शेजारींच रहाणारे कवि किरात ( श्री. भाऊसाहेब सोमण ) यांना तीं वाचून दाखविलीं. त्यांनीं माझ्या या लहानशा कृतीचें मन:पूर्वक कौतुक केलें. हें हदग्यांच्या पदांचें छोटें पुस्तक १९३८ ला छापून प्रसिद्ध केलें. हींच पदें आमच्याकडे पुष्कळ ठिकाणीं मुली म्हणतात.

'सुबोध गंगालहरी' व 'हदग्याचीं गाणीं', या दोन पुस्तकांपूर्वींच " छाया-प्रकाश " या पुस्तकाची पूर्वतयारी करून ठेवली असूनसुद्धां हें पुस्तक प्रकाशांत येण्यास मात्र १९५३ उजाडला.

पण फारा दिवसांची मनीषा पूर्ण झाल्यामुळें मला खरोखरच एक प्रकारचा सात्त्विक आनंद मिळत आहे. या पुस्तकांतील पदांची निवड करून

व आपला अभिप्राय देऊन, माझ्या हितचिंतक भगिनी श्री. इंदिराबाई संत यांनीं मला फारच सहाय्य केलें; त्याबद्दल मी त्यांची आभारी आहें.

ज्यांच्या प्रेमळ व शांत स्वभावानें मी या संसाररूपी सागरांतून कोणत्याही संकटास न जुमानतां आनंदानें पार पडूं शकलें, त्या माझ्या पतिदेवांचे चरणींच हें माझें काव्यपुष्प, अत्यंत भक्ती-प्रेमभावानें त्यांच्या एकसष्टीच्या समारंभप्रसंगीं सप्रेम समर्पण करीत आहें.

ठळकवाडी घ. नं. ३३३ बेळगांव<br>
१४ एप्रिल १९५३

**-सौ. आनंदीबाई लेले.**

---

" छाया-प्रकाश " हा सौ. आनंदीबाई लेले यांचा पहिलाच गीतसंग्रह आपल्या गीतांबद्दलची भूमिका त्यांनीं आपल्या निवेदनांत स्पष्ट केली आहे. मनावरील संस्कार, आप्तजनांचें उत्तेजन आणि विषय पद्यबद्ध करण्याची आवड यामुळेंच ' छायाप्रकाश ' साकार झाला आहे.

सौ. आनंदीबाईंनीं देवादिकांवर गाणीं रचलीं आहेत, त्याचप्रमाणें विवाह, जयंति, इत्यादि सामाजिक प्रसंगावरही त्यांनीं काव्यरचना केली आहे. मधून मधून त्यांचीं भावगीतेंही आहेत. प्रसाद आणि गेयता हें या तिन्ही प्रकारच्या गीतांचं वैशिष्ठ्य आहे. त्यांचीं भावगीतेंही बऱ्याच वरच्या दर्जाचीं आहेत.

श्री. कृष्णाबाई गाडगीळ यांच्या ' मानस सरोवर ' या स्त्रीगीतसंग्रहानंतर तशा तऱ्हेचा संग्रह माझ्या पाहण्यांत नाहीं. सौ. आनंदीबाईंच्या ' छायाप्रकाश ' नें ही उणीव भरून काढली आहे.

**-इंदिरा संत.**

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. 1068
ग्रंथ

## छाया-प्रकाश

( चाल–मी माळी, फुलमाळी ण तूं बाळा )

मी अन् तूं अभिनव कुशल चितारी, रंगवूं चित्रांच्या हारी ॥ धृ. ॥
संसाराच्या रम्य पटावर, वधुवर प्रीतीच्या वेदीवर ।
हें पहिलें, रेखित चित्र चितारी ॥ रंगवूं ॥ १ ॥
नवजीवनीं या पहांट झाली, चोंहिकडे अरुणाची लाली
रविकिरणीं हांसत वसुधा सारी ॥ रंगवूं ॥ २ ॥
वृक्षावरती बुलबुल जोडी, चोंचित चोंची पंख पिसारी ।
कुजबुजती, मंजुळ घेति लकेरी ॥ रंगवूं ॥ ३ ॥
जोडा विहरे विहंगमाचा, गगन पुरेना त्यांच्या नाचा ।
ते गाती घेती स्वैर भरारी ॥ रंगवूं ॥ ४ ॥
भवसागरीं ही जीवननौका, डोलत डौलानें घे झोका ।
हा नावाडी, तीच सुकाणु हकारी ॥ रंगवूं ॥ ५ ॥
भीषण सोसाट्याचा वारा, वर्षति वरुनि संकटधारा ।
नच ढळती, घडिती हृदय विदारी ॥ रंगवूं ॥ ६ ॥
दिनरजनीची अभिनव जोडी, प्रकाश दे छायेला गोडी ।
स्त्री पुरुषा, होय तशी सहचारी ॥ रंगवूं ॥ ७ ॥

३०–१०–४२

[library stamp]

## बंधनाविणें

बंधनाविणें जीवनांत येना, सुरम्य ती माधुरी ॥ धृ० ॥
हा वृक्ष मुळीं जखडिला ।
जणुं पृथ्वीसी बांधिला ।
जरि स्वतंत्र तो जाहला । फुलेना फळेंही त्याच्यावरी । बंधना ॥ १ ॥
या तारा बघ मोकळ्या ।
नच संगतिनें बांधिल्या ।
मधुनाद घुमावे कसे, अशा या विकल सतारीवरी ॥ २ ॥
हा वारु लगामाविणें ।
मोकळा न त्या बंधनें ।
सैराटपणें धांवतो, कसा तो येईल मार्गावरी ॥ ३ ॥
या जला अडविल्याविना ।
नच पडेल जन कारणां ।
ही अचपल चपला पुरी बंधनीं जगांत क्रांति करी ॥ ४ ॥
नित उदयाचलिं ये रवी ।
शशि तारा निशि शोभवी ।
बंधनेंच जग चाललें सुसंगत हें कल्पांतावरी ॥ ५ ॥
प्रीतीचीं जिवा बंधनें ।
तीं सुखमय करिती जिणें ।
निर्बंध जीव वर्ततो जीवनीं, पिसाट वेड्यापरी ॥ ६ ॥

२३-७-४५

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
नों. क्र. ११८००४
११।०५३

## प्रभु अवघा भरला

प्रभु अवघा भरला । अखिल चराचर व्यापुनि उरला भरला ।
प्रभु अवघा भरला ॥ धृ० ॥

रवि शशि तारा वर्तति नियमें । प्रेरक तूं सकलाला ॥ भरला ॥१॥

हें सृष्टीचें रूप मनोहर । सृजिता कोण तियेला ॥ भरला ॥ २ ॥

लक्ष चौर्यांशीं योनीमाजी । तूं नटवर नटलेला ॥ ३ ॥

विश्वचि माझें मी विश्वाचा । बोध मनीं हा ठसला ॥ ४ ॥

आनंदीआनंद गवसला । जन्मांतरीं लपलेला ॥ ५ ॥

१-१०-४५

## हृदयमंदिरीं असून देव तो न सापडे

( चाल–दाटला घनांधकार )

हृदयमंदिरीं असून देव तो न सांपडे ।
शोधिलें जनां वनांत राऊळीं चहूंकडे ॥ धृ० ॥
त्रिविध ताप जाळितो, साहवेना दाह तो ।
नामसुधा तोषवीत नीलकंठ भाबडे ॥ १ ॥
सहज बाल्य संपलें, यौवनीं मदें डुले ।
पातली जरा अतां मी । शोधुं रे कुणीकडे ॥ २ ॥
निबिड तिमिर दाटला, घोर भयद वाटला ।
बिकट पंथ शोधितां, भ्रमत चित्त बापुडें ॥ ३ ॥
पूर्व भाग्य उजळलें, ज्ञानदीप लागले ।
हृदयमंदिरीं प्रशांत, दिव्य तेज फांकलें ॥ ४ ॥
आत्मतत्व गोजिरी, मूर्ति हृदयीं बैसली ।
सकल विश्‍व कोंदली, ती दिसे चहुंकडे ॥५॥
चित्त शांत जाहलें, मुक्तिसौख्य लाभलें ।
जातेस आनंदी आज, बंधनापलीकडे ॥ ६ ॥

११-९-४८

## विसरुनि क्षण भवजाल

विसरुनि क्षण भवजाल । स्मरावा गिरिधारी गोपाल ॥ धृ. ॥

संसाराची आटाआटी ।
करितां गेली, उलटुनि साठी ।
हातीं आली, जरि ही काठी ।
तरि न सुटे जंजाळ । स्मरावा० ॥ १ ॥

बाळपणा अज्ञानें गेला ।
यौवनिं अंगीं ताठा भरला ।
जरठकाल मग कठिणची आला ।
जवळीं येई काळ । स्मरावा० ॥ २ ॥

प्रपंचधंदा, करितां जीवा ।
स्मर प्रभुवर तूं, फावे तेव्हां ।
नामस्मरणीं रमवी जिव्हा ।
सुखवील तोचि दयाळ । स्मरावा० ॥ ३ ॥

तूंचि माता, जनिता, बंधू ।
सखासोयरा, करुणासिंधू ।
चातक मी, दे त्यांतिल बिंदु ।
करुणाघन जगपाल । स्मरावा० ॥ ४ ॥

## भेट झणीं माधवा

अधिर जाहल्या जिवा  अतां झणीं भेट सख्या माधवा ॥ धृ.॥
मत्स्य तळमळे, जेवि जळाविण
चातक लक्षी, येइ कधीं घन
उदासवाणें हें मम जीवन
सफल करी केशवा  अतां झणिं० ॥ १ ॥

ध्यास लागला, तव दिनरातीं
देशिल केव्हां, मोहन भेटी
लाभेना तुजविण सुखशांति
तरि बुडत मी भवा  अतां झणिं० ॥ २ ॥

शोधित तुज मी वणवण फिरलें
घोर काननें, गिरीगव्हारें
भव्य मंदिरें, अन् लघु कुटिरें
भेट तुझी केधवा  अतां झणिं० ॥ ३ ॥

हृदयमंदिरीं, अवचित भेटी
झाली आजी तव एकांतीं
कोंडुन ठेविन सुमन-कपाटीं
जासि कसा यादवा  अतां झणिं० ॥४॥

आनंदीआनंदें भरलें
विश्व अणु कुठें, रितेचि नुरलें
भवभय कैचें आतां उरलें
संगम जीवा शिवा  अतां मज भेटलास माधवा अतां झणिं० ॥५॥

१७-८-४४

# मुरली

( चाल—या नव नवल नयनोत्सवा )

ज्या मधुर मधुर मुरलीरवां, ऐकुनि मानस हा भृंग भ्रमावा ।
तो हरि मजला दावा ॥ धृ० ॥

कांहिं सुचेना मज गृहधंदा, मन हें वेडें बनलें मुकुंदा ।
रागें भरती जावा नणंदा, कैचा धीर धरावा ॥ ज्या मधुर ॥१॥

पतिसुत वैभव तुच्छ भासतें, गोविंदा रे तुजविण मज तें ।
जनलज्जेची भीति न गमते, अर्पाया तुज जीवां ॥ज्या मधुर ॥२॥

राधा रंगली हरि-गुण-गानीं, अहं वृत्तिचा भाव नुरे मनीं ।
हरिरुप भरलें अवघें नयनीं, ध्यास मनीं प्रभु देवा ॥ज्या मधुर ॥३॥

अखिल चराचर तल्लिन झालें, मुरलिरवानें स्तब्धचि ठेलें ।
आनंदीचें हृदय निवालें, वरि सात्विक भावां ॥ ज्या मधुर ॥४॥

१-९-२७

## कृष्णाची दृष्ट

( चाल–आजि जाऊं पाहूं )

माधवासि आज गडे नीज कां न ये? दृष्ट जाहली कि काय ना कळे सये।।धृ.।।

हें प्रसन्न कमलवदन म्लान जाहलें ।
घडिघडि दचकून उठे; हृदय धडधडे ।
पाळण्यांत हालवि परि राहीना; रडे ।
।।चाल।। राजिवाक्ष कमलनयन कोठें झडविला गे ।।माधवासि ।। १ ।।

कुसुमशेज करुनी मंचकींही निजविलें ।
तरि तळमळ तळमळ करि जीव घाबरे ।
करिं विझण घेउनियां, जरि मीं रिझविलें ।
।।चाल।। तरिही शांत होई न हा काय तरि करुं गे । माधवासि ।। २ ।।

धवल चांदण्यांत अंकि घेऊनि बैसलें ।
पुष्पगंधयुक्त नभीं वायु संचरे ।
तरि न शांत होइ गडे आवरिना रडे ।।
।।चाल।। रमवूं किती श्रीहरितें हें न मज कळे गे । माधवासि ।। ३ ।।

सखये झणि घेऊनि ये गर्गमुनिवरां ।
मंत्रुनियां बांधि दोरा लावि अंगारा ।
दहि भात गोविंदावरूनि उतरा ।।
।।चाल।। कांहीं नवस राहिला कि चुकुनि काय गे । माधवासि ।। ४ ।।

जननि–हृदय विकल बघुनि तो जगन्निवास ।
हंसतवदन दावुनि कार मुदित व्रजजनांस ।
आनंदी प्रणत मनें शरण जाई त्यास ।
।।चाल।। डोळां तें ध्यान जडों प्रार्थितें सदा हें । माधवासि ।। ५ ।।

१५–१०–३२

## कालियामर्दन

( चाल : मधुर किती कुसुमगंध सुटला )

नृत्य करी कालिया--फणिवरि श्याम ।
सुमनें वर्षति सुरवर सगळे, अवलोकिति घनश्याम ॥ धृ.॥

नांदे कालिय यमुनाडोहीं ।
दूषित करी निजधाम । नृत्य करी ॥ १ ॥

गोपसुतासह धेनू चारी ।
यमुनातटिं भगवान । नृत्य करी ॥ २ ॥

प्राशितां तें जल तेथीचें ।
सकल धेनु गतप्राण । नृत्य करी ॥ ३ ॥

क्रोधें घाली झणिं उडि डोहीं ।
मर्दी फणि भगवान । नृत्य करी ॥ ४ ॥

उठवी धेनू निजलीलेनें ।
सुखि करि गोकुल धाम । नृत्य करी ॥ ५ ॥

व्रजजन ओवाळिति मनमोहना ।
आनंदीस न भान । नृत्य करी ॥ ६ ॥

१०-१२-३३

## जीवन-ज्योत

जीवनाची ज्योत माझ्या । देहताटीं लाविली । आरती ओवाळिली ॥ धृ. ॥

विश्वमंदिरांत या ।
जनिजनार्दना पहा ।
न्याहळूनि ध्येयमूर्ती ।
वृत्ति तेथें रंगली । आरती० ॥ १ ॥

साम्यतेचि समय ही ।
स्नेहगुणें उजळली ।
शांत नंदादीप तेवें ।
तेज फांके राउळीं । आरती० ॥ २ ॥

भक्तिचे मृदंग टाळ ।
भावमधुर वाजती ।
अंतराची एकतारी ।
छेडिते गीतावली । आरती ॥ ३ ॥

स्फूर्ति वल्लरीवरी ।
वाग्सुमेंहि बहरलीं ।
वेंचुनी त्यांतून कांहीं । वाहिली पुष्पांजली । आरती ॥ ४ ॥

१–८–५२

९२२९
सं. प्र.
स्थळ प्रत

## शारदा-स्तवन

विधितनये छेड विणा । अखिल स्तब्ध जगता जी स्फुरवि चेतना ।।धृ।।

अचल ब्रह्मांड गोल ।
ज्या नादें करित डोल ।
वीणारव तव अमोल ।
घुमवि गूढगुंजना । विधि०।। १ ।।

दिव्यकांति सगुण ध्यान ।
मयुरासन तव सुरम्य ।
मूर्ति ही तुझी मनोज्ञ ।
हृदयिं करित पूजना । विधि० ।। २ ।।

काव्यदेवि शारदे ।
जिव्हाग्रीं बसुनि वदे ।
तव कृपाप्रसाद दे ।
नको करूंस वंचना । विधि०।। ३ ।।

१०-८-५२

# निलगिरी

( चाल–नाज़ुक कोमल गोंडस चिमणी )

नीलगिरी हें सुंदर वैभव प्राप्त तुला दैवें ।
उंच उभारुनि तरु कर आपुले डोलसि बहु गर्वें ॥१॥
नीलवर्ण तव, नील वरी नभ नीलमेघमाला ।
प्रेमभरें त्या सन्निध आल्या तुज भेटायाला ॥२॥
प्रभातकालीं शिखरावरुनी विलोकितां गमतें ।
सिंधु पसरला जणूं धुक्याचा फसवी नेत्रातें ॥३॥
रंगिसुरंगी पुष्पें बहुविध, तरु तसे सुरुचे ।
गगनचुंबना जणूं धांवती वृक्ष नीलगिरीचे ॥४॥
जिकडे तिकडे नयनमनोहर नील वृक्षराजी ।
मोदें डुलती नील कमलिनी नील जलामाजी ॥५॥
कुठें धांवती निर्झर दुडदुड तृषितां शांतविती ।
किलबिल करिती मधुर पक्षिगण मानस रंजविती ॥६॥
मळे चहाचे हिरवे, लवलीं झुडपें बुंदाचीं ।
'सिंकोना', सम वनस्पती बहु गणती ना त्यांची ॥७॥
तव अंकावरि मनुजें केलीं विश्रांतिस्थानें ।
विधि–रेखांकित चित्रीं भरिले रंग मानवानें ॥८॥
दीप बिजलिचे संध्यासमयीं लुकलुकती जेव्हां ।
वाटे भूवर ये तारागण क्रीडाया तेव्हां ॥९॥
गात्रें झालीं बधिर थंडिनें हुडहुडि अंगि भरे ।
सखी शेगडी, चहा सवंगडी त्यागिल कोण बरें ॥१०॥
निसर्ग–शोभा–निरीक्षणाची ओढ परी स्वमना ।
म्हणुनि त्यागिले निजध्येयास्तव सख्या सोयऱ्यांना ॥११॥
सृष्टि सतीचें वैभव देई मोद अंतरला ।
नंदनवनिं या गमे पावलों त्यजुन भूतलाला ॥१२॥

१–८–३६

C0C4...

## वनवासास निघालेला राम सीतेचें सांत्वन करितो

( चाल–कशि मधुवनीं मुरली वाजविली )

कशि विरहव्यथा मी साहुं अतां ।
न्या संगें वनि रघुनाथा । मज प्रिय कान्ता ।।धृ०।।

दुःखें वनिचीं दुःसह भारी ।
कोमेजे तव देहलता । कशि विरह० ।। १ ।।

जीवन अपुल्या प्रेमजलाचें ।
असतां कसली मग चिंता । कशि विरह० ।। २ ।।

हिंस्र पशूतें पाहुंनि भीशील ।
वनिची तेंवि भीषणता । कशि विरह० ।। ३ ।।

संगें असतां, तुम्हि रघुनाथा ।
भिववी न कालहि मम चित्ता । कशि विरह०।।४।।

पाहुनि निश्चय जानकिचा तो ।
राघव नेई वनि वनिता । कशि विरह० ।। ५ ।।

आनंदी आनंदे प्रभुगुण ।
गातां विसरे भवचिंता । कशि विरह० ।। ६ ।।

१५-३-३४

## व्रजनारी--यशोदा संवाद

( चाल-गोविंद श्याम कंसारी )

सुखकंद हा गिरिधारी । बालक मम सगुण मुरारी ।। धृ० ।।

यशोदा भुवनीं व्रज-ललना ।
करिं धरुनी मेघश्यामा ।
वदती गे आवरी कृष्णा ।
।। चाल ।। छळतसे आम्हां हा भारी । सुखकंद ।। १ ।।

तुम्हि येउनि माझ्या सदनीं ।
सांगता नित्य गाऱ्हाणीं ।
तीं सतत श्रवणीं ऐकोनी ।
।। चाल ।। शिवविला उगिच कंसारी । सुखकंद ।। २ ।।

ऐक गे यशोदे जननी ।
काल रात्रीं गृहीं येवोनि ।
मंचकीं नकुल सोडोनि ।
।। चाल ।। जाई पळोनी कुंजविहारी । सुखकंद ।। ३ ।।

घोर निशासमयिं तव भुवनीं ।
कसा येइल शारङ्गपाणी ।
पांच वर्षेंहि त्यास अजुनि ।
।। चाल ।। नच झालीं गडे तीं पुरीं । सुखकंद ।। ४ ।।

मधुसूदन तुमच्या संगें ।
निःसंशय बिघडे हा गे ।
निशिदिनीं संग तुमचा गे ।
।। चाल ।। तुम्ही खटनट-बालट पोरी । सुखकंद ।। ५ ।।

किती भाग्यवान व्रजवासी ।
जिथें वास करी हृषिकेशी ।
गोपाल बालिका त्यासी ।
।। चाल ।। प्रार्थि कीं प्रभू तूं तारी । सुखकंद ।। ६ ।।

१०-११-३०

# हा रवींद्र, हा कवींद्र

( चाल–घे खुशाल अंकुशास )

हा रवींद्र हा कवींद्र, हाय आज लोपला ॥ धृ० ॥
तळपतो नभीं रवी, हा महीस शोभवी ।
ज्ञानदीप हा सतेज, मालवीत काळ हा ॥ १ ॥
पौर्णिमाहि नारळी, नांव घालुनी जळीं ।
जावया दुज्या तिरास, काय आज चालला ॥ २ ॥
पदवी थोर दिधली, ती न अंगिकारिली ।
स्वदेशप्रेम, स्वाभिमान पूर्णतेस पावला ॥ ३ ॥
जे उगाच निंदिती, पाश्चिमात्य भारती ।
वाक्शरेंच विंधिसी, रुचेन ते मुळीं तुला ॥ ४ ॥
गुरुदेव मानिती, महात्माजि तुजप्रती ।
देह त्यागुनी जगांत, कीर्तिरूप राहिला ॥ ५ ॥
शांतिच्या निकेतनांत, शिष्यवृंद घे सभोंत ।
भासतो महर्षि व्यास स्वाश्रमींच बैसला ॥ ६ ॥
काव्य जे गितांजली, ख्यात होत भूतलीं ।
शांतिदूत हा रवींद्र, ब्रह्मिभूत जाहला ॥ ७ ॥
हिंद माउलीस या, शोकि लोटुनी पहा ।
स्वर्गीचे सुखोपभोग, रुचति काय ते तुला ॥ ८ ॥
स्वतंत्र भारतास या, ये झणीं करावया ।
जन्म घेउनी इथेंच, विनति ही मुने तुला ॥ ९ ॥
तव स्मृति–समाधिला, काव्यहार वाहिला ।
कण्हेरिचा गमेल काय, कविवराच हा तुला ॥१०॥

७–८–४१

# नूतन आदर्श महिला माता झाल्यावर

सख्या जा चढून हिमनगशिरीं । घे ध्येयाची ध्वजा करीं । जा चढून॥ध्रु०॥

पायथ्यास मी बसेन येथें ।
गाईन स्फूर्तीचीं नव गीतें ।
हृदयसतारीवरी ॥ १ ॥

सुप्रेमाची दिली शिदोरी ।
मम नेत्रींच्या अश्रुजलावरी ।
तृप्त तृषा तव करी ॥ २ ॥

बाळें चिमणीं गोजिरवाणीं ।
जपेन जीवा-परी तया मी ।
नको काळजी उरीं ॥ ३ ॥

या मार्गें जे अनेक जाती ।
क्षुधे-तृषेनें व्याकुळ होती ।
तृप्त तयां मी करी ॥ ४ ॥

दमले श्रमले थकले कोणी ।
उत्तेजित मी त्यांसि करोनि ।
देईन धाडुनि वरी ॥ ५ ॥

वाटाडी मी झालें इथली ।
पायथ्यास ही वाडि वसविली ।
जीवन गंगेतिरीं ॥ ६ ॥

साध्य साधुनी येइ नरेशा ।
चातकसम करि मार्गप्रतिक्षा ।
धीर धरुनि अंतरीं ॥ ७ ॥

भिन्न देह अन् ध्येयें असती ।
द्वैतांतुनि ऐक्याची पूर्ती ।
करूं मंगल साजरी ॥ ८ ॥

१-९-४५

# नवविवाहित आदर्श महिलेची अपेक्षा

घेई ध्वजा ही करीं, सख्या चल, चढून गिरिच्या शिरीं ॥धृ.॥

स्फूर्तीदात्री तुलाच मी रे ।
कंटकमय हीं गिरिगव्हारें ।
चढण खडी त्या वरी ॥ सख्या ॥ १ ॥
जाई धैर्यें गिरी पठारीं
मानवतेच्या दिव्य मंदिरीं ।
राहि उभा ओसरी ॥ सख्या ॥ २ ॥
येत हळू मी, तुजमागोनी ।
म्हणशिल अबला मज हांसोनी ।
राग नये अंतरीं ॥ सख्या ॥ ३ ॥
पुजासाहित्या घेवोनि ।
धवल सुमनमाला गुंफोनी ।
घेइन झारी करीं ॥ सख्या ॥ ४ ॥
येता लगबग तुटेल माला ।
बद्ध करील ती मम चरणाला ।
जपून येणें तरी ॥ सख्या ॥ ५ ॥
भावाच्या निरांजन ज्योती ।
वाटे झंझावातें विझती ।
आड पदर मी धरी ॥ सख्या ॥ ६ ॥
सावधान तुज समीप आलें ।
जगन्माउलीते पूजियलें ।
धरूं पंचारति करीं ॥ सख्या ॥ ७ ॥

३०-८-४५

## स्तब्ध उभी राहिली भ्रांत होय बाला

( चाल– भास मला जाहला )

स्तब्ध उभी राहिली, भ्रांत होय बाला ।
मनीं भिमकबाळी करित विस्मयाला ॥ धृ० ॥

रत्नजडित मंडपांत ।
दमयंती सखिसहीत ।
रत्नमाळ करिं धरोनि ।
न्याहळी नलाला ॥ स्तब्ध० ॥ १ ॥

वदत सुंदरी सखीस ।
भ्रांत पडे कां मनास ।
दिसति पंचमूर्ति केंवि ।
ओळखूं कुणाला ॥ स्तब्ध० ॥ २ ॥

देह पूर्ण अर्पियला ।
नैषधाधिशाला ।
प्रगटवि कीं प्रभु तयास ।
विनति तव पदाला ॥ स्तब्ध० ॥ ३ ॥

जरि असेल प्रेमसत्य ।
होउं तरि रूप प्रगट ।
त्याविण मज सकळ तात ।
जाण हे दयाळा ॥ स्तब्ध ॥ ४ ॥

ऐशा त्या दीनवचनिं ।
द्रवले ते सुर स्वमनीं ।
प्रगट करूनि स्वकीय रूपें ।
वसति स्वस्थलाला ॥ स्तब्ध० ॥ ५ ॥

हर्षभरें दमयंती ।
वरि प्रेमें नलनृपती ।
सुरवर वर्षति सुमनें ।
वाद्यघोष झाला ॥ स्तब्ध० ॥ ६ ॥

५-१०-२९

## येत कैलासीं, हरिहरासि भेटायासि

( चाल–सगुण गुणमाया )

येत कैलासीं हरिहरासि भेटायासी ॥ धृ० ॥

वार्ता ऐकुनि, शिव झणिं उठला ।
स्वागत विष्णूचें करण्याला ।
निजवस्त्रेंहि शोधायाला ।
सुचेनच त्यासी । हरिहरासि० ॥ १ ॥

उरगगुण कटीं दृढ बांधिला ।
गजचर्मांची कौपिन त्याला ।
सामोरा झणिं धांवत गेला ।
खगपतिपाशीं । हरिहरा० ॥ २ ॥

गरुड देखुनी कद्रुसुताला ।
कंप सुटे तों भूवरि पडला ।
कौपिन गळली शिव राहिला ।
नग्न तसाची । हरिहरा० ॥ ३ ॥

हरहरिस्वरुपीं तल्लिन झाला ।
नग्न स्थितीचें भान न त्याला ।
तन्मयता तव प्रभु आम्हाला ।
लाभो खाशी । हरिहरा० ॥ ४ ॥

१–१०–२२

## या मृदु सुमनशय्येप्रती

( चाल– या नव नवल नयनोत्सवा )

या मृदु सुमनशय्येप्रती, ।
त्यजुनी लोळसि कां गे भूवरती ।
कोप प्रिये कां चित्तीं ॥ धृ० ॥

मलिन वसन हें, केस मोकळे ।
अलंकार कां, त्वां अजि त्यजिले ।
इच्छिसि मनिं जें, वद या वेळें ।
करिन तयाची पूर्ती ॥ या मृदु० ॥ १ ॥

पूर्वी जे वर, दिधले नाथा ।
प्रथमवरें, राज्यावरि भरता ।
स्थापुनि, रामा धाडि वनीं त्या ।
सत्य करी वचनें तीं ॥ या मृदु० ॥ २ ॥

वध्दचि दशरथ कैकयिवचनें ।
व्याकुल हृदयीं बहु शोकानें ।
प्राण त्यजिले सुतविरहानें ।
ही कलहाची रीती ॥ या मृदु० ॥ ३ ॥

३–५–२३

मराठी ग्रंथ संग्रहालय
नों. क्र. ९४८७४
११।८५३

## शाश्वत नाहीं काया

( चाल–आपुला आपण वैरी० )

शाश्वत नाहीं काया । दवडु नको क्षण जाशील वायां ॥ धृ० ॥

लक्ष चौऱ्यांशीं योनि फिरोनी ।
तुज लाभ नरतनूचा या ।
सावध हो सार्थकिं लावाया ॥ शाश्वत० ॥ १ ॥

गृह सुत धन हें माझें माझें ।
प्रियतम माझी जायः ।
कारण सर्वही तुज शिणवाया ॥ शाश्वत० ॥ २ ॥

अंति तुझ्यास्तव कोणि न रडती ।
निजसुख जातें विलया ।
म्हणुनी आक्रोशें पिटिती हृदया ॥ शाश्वत० ॥ ३ ॥

मोहानें हें जग व्यापियलें ।
अवघी ईश्वरी माया ।
शिकविल सद्गुरु तुज ओळखाया ॥ शाश्वत० ॥ ४ ॥

ऐकुनि बोधा जरि मन धांवे ।
मायाजाळीं पडाया ।
सावध करि मज सद्गुरुराया ॥ शाश्वत० ॥ ५ ॥

६–४–२८

## संताविण त्रिजगीं पाही

( चाल–त्यजि भक्तासाठीं )

संताविण त्रिजगीं पाही । मज गमे श्रेष्ठ ना कांहीं ॥ धृ० ॥
म्हणु थोर अवनि जरि फार ।
परिवेष्टि सिंधुसंभार ।
जरि थोर म्हणू त्या फार ।
आगस्ति प्राशि तयांहीं ॥ संताविण० ॥ १ ॥
परि तोहि सान होई ।
नभि खद्योतासम राही ।
आकाश श्रेष्ठ जरिही ।
वामनपद एक न राही ॥ संताविण० ॥ २ ॥
धरि वामन बटु अवतार ।
तों वाढत वाढे फार ।
आकाश भेदुनी पार ।
पुनरपीहि उरुनी राही ॥ संताविण० ॥ ३ ॥
त्या सर्वव्यापि प्रभुला ।
सांठवि जो अंतरिं त्याला ।
नच श्रेष्ठ त्याहुनी दुसरा ।
मज गमे अन्य कोणीही ॥ संताविण० ॥ ४ ॥
त्या संत–चरण–कमलीं ।
आनंदि भ्रमरसम रमली ।
भवचिंता सारी हरली ।
निर्वाणपदीं मग राही ॥ संताविण० ॥ ५ ॥

१–१–२०

## सदय झणिं धांवे श्रीहरी

( चाल–हरि रे तुझि मुरली माधुरी )

सदय झणिं धांवे श्रीहरी प्रिय भगिनी तव, संकटिं पडली ।
कोण तिला उद्धरी ।। धृ. ।।
कपटद्युतानें, पतिचें हरिलें–।
धनबल आणि लज्जा ।
दु:शासन मज ओढि सभेसी ।
ऋतुमति मी मंदिरीं ।। सदय० ।। १ ।।
भीष्म–द्रोण–धृतराष्ट्र–विदुर हे ।
कां झांकिति नयनां ।
दावुनि अंका खल दुर्योधन ।
बैस म्हणे सुंदरी ।। सदय० ।। २ ।।
कर्मगती मम अजुनी कां ही ।
न कळे पुरि सरली ।
मम वसनां कर लावि नराधम ।
फेडितसे चिरनिरी ।। सदय० ।। ३ ।।
पंचाननसम पंचपती मम ।
दीनासम बसले ।
बाहतसे हरी तुज ही अबला ।
मोकलिसी कां दुरीं ।। सदय० ।। ४ ।।
ऐकुनि हांका धांवत आला ।
कळवळला हृदयीं ।
अगणित वस्त्रें द्रौपदिसतीला ।
हरि पुरवी निज करीं ।। सदय० ।। ५ ।।
भावबळें हा प्रभु आकळिला ।
दासा साह्य करी ।
भक्तांचा कैवारी दयाघन ।
तोचि अम्हां उद्धरी ।। सदय० ।। ६ ।। ७–६–२०

## सद्गुरुनाम वद वाचा

( चाल– श्रीरंग राय रूपाचा )

सद्गुरूनाम वद वाचा । झणिं जाइल शोक मनाचा ॥ धृ० ॥
या नश्वर जगतीं पाही ।
लवलेश सुखाचा नाहीं ।
बुडूं नको तूं मायाडोहीं ।
जा शरण सद्गुरुपायीं ।
उपदेश ऐक हिताचा ॥ झणिं जाइल० ॥ १ ॥

भवसिंधूच्या परतीरा ।
नेइल तोचि तुम्हांला ।
लावील सन्मार्गाला ।
देईल निजपद थारा ।
हा अगम्य महिमा गुरुचा ॥ झणिं जाइल० ॥ २ ॥

सच्चिदानंद प्रभूला ।
दावील तोचि तुम्हांला ।
तव विमल सद्गुणां गाया ।
स्फूर्ति दे तूंचि गुरुराया ।
हा एकच हेतु मनिचा ॥ झणिं जाइल० ॥ ३ ॥

२३–३–२३

## उठुनि प्रभातीं कवणाचे मज

(चाल– नाजुक कोमल गोंडस चिमणी)

उठुनि प्रभातीं, कवणाचें मज मुखदर्शन होई ।
त्यजुनि मला हा पक्षिराज कीं म्हणुन आज जाई ॥१॥
स्वच्छ कराया तया अंगणीं घेउनिया आलें ।
परि नव्हतें तन्मास हें मम चित्ताला कळलें ॥ २ ॥
भरकन कैसा उडुनी गेला चुकवुनि नेत्रांतें ।
लालनपालन प्रेमें केलें आजवरी मी तें ॥ ३ ॥
व्यर्थचि झालें, चित्त विरसलें, विफल सर्व वाटे ।
सहवासाचें प्रेम बिकट हें तत्त्व कळों येतें ॥ ४ ॥
आम्रतरूवर जाउनि बैसे मुक्ति सुखाभोगीं ।
तनुविक्षेपां बहुविध करुनी शिकवी मजलागीं ॥ ५ ॥
देह-पिंजऱ्यामधीं बैसला जीव कीट पाहीं ।
जाइल केव्हां उडुनी याचा नेम नसे कांहीं ॥ ६ ॥
नश्वर जग हें समजुनि घेई, भ्रांत नको होऊं ।
मायामोहें जग चाले हें भुलुनि नको जाऊं ॥ ७ ॥
आसक्तीनें बद्ध जाहले जीव सर्व बाहे ।
निरासक्त तो धन्य जगीं या मजसम सुख लाहे ॥८॥
देहासक्ती हाच पिंजरा ओळख तूं वेगें ।
सुटावयाचा कांहि यत्न कर हाच बोध तुज गे ॥ ९ ॥
बोला बोलुनि उपदेशाच्या ऐशापरि शुक तो ।
जाय उडोनि हृदयीं धरितां भव ह्याचा चुकतो ॥१०॥
आनंदीच्या हृदयीं घुसले बोल जसे शर ते ।
मोह गळाला मग ती कैची भवभीती उरते ॥ ११ ॥

१०–१२–२१

## उठि आत्मारामा बाळा

( चाल–होईल कलह म्हणोनी )

उठि आत्मारामा बाळा । सुमती माता उठवी तुजला ।। धृ० ।।

समवृत्तीची पहांट झाली ।
भावारुणाची पसरे लाली ।
त्यांतुनि रवि प्रगटला ।
ज्ञानाचा जो मूर्तची पुतळा ।। उठि० ।। १ ।।

उपनिषदांचें सार्थक झालें ।
हेतु मनींचे सकलही पुरले ।
जागृति स्वप्नीं भरला ।
श्रीहरी अवघा व्यापुनि उरला ।। उठि० ।। २ ।।

भवभयचिंता सरली आतां ।
आनंदिआनंद दाटे चित्ता ।
तो मोद भरुनी उरला ।
आक्रमुनीया त्रैलोक्याला ।। उठि० ।। ३ ।।

३–४–२१

## करिं दिधली प्रिय बाला आपुल्या

( चाल–सत्य वदे वचनाला )

करिं दिधली प्रिय बाला आपुल्या ।
विहिणी तिज सांभाळा । आतां कन्येसम प्रतिपाळा ॥ धृ० ॥

आमुच्या प्राणधनाचा ठेवा ।
जतन करा प्रेमें दिधला ॥ विहिणी० ॥ १ ॥

शिकवा रीती स्वगृहींची तिज ।
सुशिक्षित परि ती बाला ॥ विहिणी ॥ २ ॥

मातेसम समजुनि सांगावें ।
गृहकार्यी चुकतां तिजला ॥ विहिणी० ॥ ३ ॥

सौख्यद हो बाले ! सकलाला ।
संतोषवुनि तिज पतिला ॥ विहिणी० ॥ ४ ॥

आर्य सती सावित्रीसम तूं ।
भूषवि कन्ये उभयकुलां ॥ विहिणी ॥ ५ ॥

सोय जाणती तेचि सोयरे ।
तत्त्व पटवुं हें जगताला ॥ विहिणी० ॥ ६ ॥

कार्य आनंदें पावो सिद्धी ।
वंदुं उभय गजवदनाला ॥ विहिणी० ॥ ७ ॥

२४–५–३२

## अभिनव मंगलाष्टकें

( वृत्त– शार्दूलविक्रीडित )

मांगल्यें नटला सुदीन गमतो, हा आज हर्षभरें ।
आली लग्नघटी, समीप जमले हे सोसरे धायरे ।
यावें त्वां कुलस्वामिनी, गणपती, कार्यास श्रीशारदे ।
गंगे सिंधु सरस्वती सकल या, गोदावरी नर्मदे ॥ १ ॥

गंगा भूषवि सागरा गमत ही, तैशी धरा अंबर ।
शोभे गौरिहरा प्रसन्नवदना, भामा जशी श्रीधरा ।
जैशी ही चपला घनांस सुखवी, आनंदवीते धरा ।
तैशी सौख्यद हो सगूण सुशिला ही नोवरी या वरा॥ २ ॥

होतां अंतरपाट दूर भिडलीं, जीं लोचनां लोचनें ।
झालें दों हृदयास मीलन जणूं, भारावलीं प्रीतिनें ।
अर्पावी सुमनावली उभयतां, जी ही करीं संप्रती ।
साक्षी देव द्विजास ठेउनि वरा, व्हावे सुखी दंपती ॥ ३ ॥

होतां सप्तपदी दुजेपण नुरें, ऐसें ऋषी सांगती ।
संसारीं सहचारि होउनि क्रमा आयु:पथा संगतीं ।
टाका या नवजीवनीं पद पुढें, ऐश्वर्य संपादुनी ।
विद्याबुद्धिगुणें सुसंस्कृत मनें, व्हा ध्येयवादी तुम्ही ॥ ४ ॥

## अभिनव मंगलाष्टकें

( वृत्त- शार्दूलविक्रीडित )

मांगल्यें नटला सुदीन गमतो, हा आज हर्षभरें ।
आली लग्नघटी, समीप जमले हे सोसरे धायरे ।
यावें त्वां कुलस्वामिनी, गणपती, कार्यास श्रीशारदे ।
गंगे सिंधु सरस्वती सकल या, गोदावरी नर्मदे ॥ १ ॥

गंगा भूषवि सागरा गमत ही, तैशी धरा अंबर ।
शोभे गौरिहरा प्रसन्नवदना, भामा जशी श्रीधरा ।
जैशी ही चपला घनांस सुखवी, आनंदवीते धरा ।
तैशी सौख्यद हो सगूण सुशिला ही नोवरी या वरा॥ २ ॥

होतां अंतरपाट दूर भिडलीं, जीं लोचनां लोचनें ।
झालें दों हृदयास मीलन जणूं, भारावलीं प्रीतिनें ।
अर्पावी सुमनावली उभयतां, जी ही करीं संप्रती ।
साक्षी देव द्विजास ठेउनि वरा, व्हावे सुखी दंपती ॥ ३ ॥

होतां सप्तपदी दुजेपण नुरें, ऐसें ऋषी सांगती ।
संसारीं सहचारि होउनि क्रमा आयु:पथा संगतीं ।
टाका या नवजीवनीं पद पुढें, ऐश्वर्य संपादुनी ।
विद्याबुद्धिगुणें सुसंस्कृत मनें, व्हा ध्येयवादी तुम्ही ॥ ४ ॥

धर्म, अर्थ नि काम साधुनि तुंवा, संतोषवावा पती ।
होई तूं सहजीवनीं चतुरसा मंत्री नृपा संगतीं ।
वाढी प्रेमळ माउली शिशुस जैं, तैशीच हो भोजनीं ।
भूलोकीं उतरेल स्वर्ग असतां, ऐशी गृहस्वामिनी ॥ ५ ॥

वाटे हा भवसिंधु पार तरण्या तूं नाव, तो नाविक ।
प्रीतीच्या दृढ बंधनें बनविली, सुदृढही आणिक ।
झंझावात सुटोन वर्षति सरी, जैं संकटाच्या तरी ।
धैर्यानें परतीर गांठुनि तुम्ही, व्हावें सुखी भूवरी ॥ ६ ॥

जेवीं ही वसुधा वसंत ऋतुच्या संगें दिसे हांसरी ।
दोघांच्या मधुमीलनें दरवळे सौगंध सृष्टीभरी ।
तैसा संगम हा तुम्हां सुखद हो, आदर्श व्हावें जनीं ।
देवो संतति संपती प्रभु तुम्हां, आयुर्बला येथुनी ॥ ७ ॥

काव्याच्या करि कुंकमार्चित अशा घेवोनिया अक्षता ।
आनंदें उधळूं वधूवरशिरीं, कल्याणमस्तु तथा ।
आशिर्वाद तुम्हांस मंगल दिले, होवो सदा मंगल ।
वाद्यें वाजति तैं द्विजें उधळिल्या मंत्राक्षता मंगल ॥ ८ ॥

१-४-५२

# प्रिय तुजला कां हरि

प्रिय तुजला कां हरी, कळे ना तुळशीची मंजिरी ॥ धृ. ॥

गेंददार हा गुलाब हंसरा ।
शेवंतीचा फुले फुलोरा ।
जाइजुईचा नाजुक नखरा ।
भुरळ पडेना परी । कळेना० ॥ १ ॥

निशिगंधाचा गुच्छ उमलला ।
तरि न अबोली बोले बोला ।
मधुमालतीला बहार आला ।
बकुल तिची सहचरी । कळेना० ॥ २ ॥

मदनबाण हा मदांध डोले ।
सुवर्ण चंपक हांसुन बोले ।
उग्र दर्प जणु त्याचा पसरे ।
उन्नत धनिकापरी । कळेना० ॥ ३ ॥

दवणा मरवा पांचू हिरवा ।
पारिजातक हा नाजुक बरवा ।
हिरवा चांफा गोड सुवासें ।
मोहित तुज ना करी । कळेना० ॥ ४ ॥

ही तर वनिची भोळी बाला ।
दृढ भक्तीनें आकळि तुजला ।
म्हणुनी वृंदावनिं रमसि कां ? ।
तिज गरिबाचे घरीं । कळेना० ॥ ५ ॥

२२-१०-५२

## आरती वटसावित्रीची

( चाल-आरती ज्ञानराजा )

आरती ओवाळीतें, सति सावित्रि तूंतें ।
आळवुनी भक्तिभावें, पदिं माथा ठेवीतें ॥ धृ० ॥
पुजूं ती धन्य साध्वी । सोडवी पति काळाहातीं ।
गाजली तेणें कीर्ती । गाऊं स्तुति तिची किती ॥ आरती०॥१॥
माता पिता धन्य तीचा । सासु श्वशूर पती ।
उभयही कुलें जिनें । उद्धरिलीं अहो ती । आरती० ॥ २ ॥
ज्येष्ठ शुद्ध पौर्णिमेसी । वट पूजिती ज्या नारी ।
तुजसम वैभवातें । पावती त्या पतिव्रते । आरती० ॥ ३ ॥
सद्भावें पुजुनिया । तुज वंदी आनंदी ।
प्रार्थना हीच तूंतें । सत्वबला दे मातें । आरती० ॥ ४ ॥

५-८-२९

## आरती हरितालिकेची

( चाल—मंगलगौरी तारि अम्हांसि )

आरति करूं हरितालिकेला । ओवाळूं सखिसह पार्वतिला ।। धृ. ।।

उपवर झाली हिमनगदुहिता ।
श्रीविष्णू वर योजि तिज पिता ।
मानेना परी, गिरिजे चित्ता ।
प्रीती जडली शिवचरणाला ।। आरति० ।। १ ।।

ताता नकळत, रुसुनि वनांतें ।
जाई सखिसह, तप करि तेथें ।
प्रसन्न शिव, वर देत तियेते ।
वरुनी पुरविन, तव हेतूला ।। आरति० ।। २ ।।

दुःखित हिमनग, शोधि सुतेला ।
सहजीं आला, त्याच वनाला ।
देखुनि सखिसह, शिवपार्वतिला ।
आनंदें धरि हृदयिं तियेला ।। आरति० ।। ३ ।।

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
सं. नं. काव्य ९२२८
स्थळ प्रत

जामातासह गृहिं तनयेला ।
आणुनि, केला लग्नसोहळा ।
गिरिजेनें शिवशंकर वरिला ।
सुरवर वर्षति तैं सुमनाला ॥ आरति० ॥ ४ ॥

भाद्रपदमासीं, शुद्ध तृतीया ।
हस्तनक्षत्रीं, करित तपा या ।
म्हणुनि पुजूं, या शुभ समया ।
घेउनि पंचामृति पूजेला ॥ आरति० ॥ ५ ॥

बहुविध पत्रें–पुष्पें वाहूं ।
मधुर फळें नैवेद्यां दावूं ।
रौप्य निरांजन, तबकीं लावूं ।
ओवाळूं मंगल जननीला ॥ आरति० ॥ ६ ॥

सखि पार्वतिसह, पूजुं शिवातें ।
करुनि उपोषण, आळवुं त्यातें ।
देवो चिरसौभाग्य अम्हां तें ।
हीच आस गोपालसुतेला ॥ आरति० ॥ ७ ॥

४–३–२१

## आरती सद्गुरुची

( चाल–जय जय जय मुनिराज )

जय जय जय गुरुराज । निर्गुण सुखधामा ।
पंचप्राणांची या, आरति करूं तुम्हा ।। धृ० ।।

मायायोगें तुमचें स्तवन मी करिन म्हणें ।
परि ती माया लज्जित होय तुम्हां नेणें जय ।। जय०।। १ ।।

वेद-श्रुतीसहि न कळे अगम्य तव महिमा ।
नेती नेति म्हणोनी, शेवटिं धरि मौना ।। जय जय० ।।

त्रिभुवनिं उपमा द्याया, अन्य नसे कांहीं ।
तेजोराशी दिनकर तोहि उणा होई ।। जयजय० ।। ३ ।।

गुरुमाउलि मज द्यावा, अंतरिचा प्रेमा ।
माता जेवीं शिशुतें पाजी पय पान्हा ।। जय जय० ।। ४ ।।

गुरुराया तारा मज, बुडतें भवडोहीं ।
गोपालाची बाला चरणीं नत होई ।। जय जय० ।। ५ ।।

१–१०–२

## जय जय जय गजवदना

( चाल-सुंदर मुख तुंदिल तनु )

जय जय जय गजवदना, गौरिनंदना ।
सुरवर तुज नमित सतत विघ्ननाशना ॥ धृ० ॥
रत्नजडित मुकुट शिरीं, कर्णि कुंडलें ।
पीतवसन रम्य कटीं शोभतें भलें ।
मुक्तावलि सुमनहार कंठि शोभले ।
( चाल ) सुखसदना, गजवदना,
सुमति द्या मना ॥ जय०॥ १ ॥

सिंहासनि रम्य सगुण सदय मूर्ति ती ।
वामांगीं बैसलि ती प्रिय सरस्वती ।
ऋद्धि सिद्धि दोहिंकडे तिष्ठती सती ।
( चाल ) विद्यानिधि, तूं जगती,
हे दयाघना ॥ जय० ॥ २ ॥

ऐसा हा सुरनरेंद्र शोभतो अती ।
जणु वाटे चंद्रकला फांकल्या क्षितीं ।
निज तेजें भान हरी हा जगत्पती ।
( चाल ) शरणागत पतितांच्या
चुकवि यातना ॥ जय० ॥ ३ ॥

मंगलमय, मंगलनिधि, मंगलानना ।
वक्रतुंड, मोदकप्रिय, मूषकवाहना ।
सद्बुद्धीदायक तूं, शंभुनंदना ।
( चाल ) आनंदी प्रणत पदीं
तव गजानना ॥ जय० ॥ ४ ॥

९-४-२०

## कृष्ण सगुण स्वरुप हेंचि

( चाल–भांग असा उलटाचि शोभे० )

कृष्ण सगुण स्वरुप हेंचि, मोदितें मनाला ॥ धृ० ॥
भक्तिसुमनमाला, वाहुं या तयाला ।
हृदयि सतत हेंचि ध्यान, शरण जाउं त्याला ।
सगुण शाम बाला । कृष्ण० ॥ १ ॥
रत्न मुकुट शोभे, कुरल केशभारा ।
कानि कुंडलें विलोल, मधुप भुलति त्याला ।
जेवि कमलिनीला ॥ कृष्ण० ॥ २ ॥
शंख, कमल शोभे, हिरकवलय हातीं ।
भृगुपद तें हृदि विलसे, मिरवितो तयाला ।
ब्रम्हनिष्ठतेला ॥ कृष्ण० ॥ ३ ॥
मदनमोहि मूर्ती, लाजवी शशीला ।
पीतवसन रम्य दिसे, मेखला कटीला ।
गळां सुमनमाळा ॥ कृष्ण० ॥ ४ ॥
चरणीं नूपुरांचा झणत्कार होई ।
श्रुतिमधुर रव सुरम्य, सुरवरादिकांच्या
मोहितो मतीला । कृष्ण० ॥ ५ ॥
बांसरी निनादे, रमवि गोपबाला ।
युवति–युवक मिळुनि सकल, करिति रासक्रीडा ।
धरुनि गान ताला । कृष्ण० ॥ ६ ॥
पाहुनी तयांच्या नयनरम्य लीला ।
तृषित नेत्र तृप्त होति, गोप लजेच्या ।
शांति ये मनाला। कृष्ण० ॥ ७ ॥

३–४–१९

## हे दयाघना तारि सदय गुरुराया

( चाल–हे प्रभो विभो अगाध० )

हे दयाघना तारि सदय गुरुराया ।
बुडत मी भवाब्धित वायां ।। धृ० ।।

उच्च नीच योनि फिरोनी ।
भोगिलें दुःख बहु परि मीं ।
नरतनू सुकृतेंकरुनी ।
लाभे परि भुलवी माया ।। हे दया० ।। १ ।।

अज्ञानें शिशुपण जाई ।
उन्माद यौवनीं येई ।
विषयीं मन रंगुनि जाई
फावेना तुज आठवाया । हे दया० ।। २ ।।

वृद्धापकाळिची स्थिती ।
इंद्रियें विकल बहु होतीं ।
चित्तास पडतसे भ्रांती ।
दुःखानें पीडित काया । हे दया ०।। ३ ।।

लागूं दे चटक नामाची ।
मग माया तेथें कैंची ।
स्वानंदप्राप्तिते याची ।
आनंदी विलिन गुरुपाया । हे दया० ।। ४ ।।

१–१०–२३

## का बोलसी न बोला

कां बोलसी न बोला । धरिलास कां अबोला ।। धृ० ।।

कुंजांत वाजलेली ।
मधु मुरली ऐकियेली ।
धांवोनि येथ आलें ।
लपलास रे कशाला ।। कां बोल० ।। १।।

चित्तांत नाम तूझें ।
दिनरात ध्यान तूझें ।
नच देहभान उरलें ।
मी-तूंपणाच हरला ।। कां बोल० ।। २ ।।

ही राधिका तुझी अन् ।
तूं कृष्ण एक माझा ।
द्वैतास ठाव कोठें ।
आतां नसेच उरला ।। कां बोल० ।। ३ ।।

तूं बोल बोल किंवा ।
बोलूं नकोस कांहीं ।
नच सौख्य दुःख त्याचें ।
आनंद सर्व भरला ।। कां बोल० ।। ४ ।।

१२-९-४४

## ज्ञानेश्वरी अमृतघट

ज्ञानेश्वरी अमृतघट । भरुनि जणू ओसंडत ॥ धृ. ॥

फिरुनि फिरुनि योनि बहुत ।
जीव-विहग होति त्रस्त ।
कर्मभोग सरतां हा ।
दृष्टिपथीं ये अवचित ॥ ज्ञाने० ॥ १ ॥

अमृत श्रीकृष्णबोल ।
पार्थसखा घट सखोल ।
वाटितसे ज्ञानदेव ।
पिउनि सुधा जीवमुक्त ॥ ज्ञाने० ॥ २ ॥

यत्नें घट सांपडेल ।
पंगु गिरी उल्लंघिल ।
संत पंथ सांगतील ।
जीवशिवा ऐक्य तेथ ॥ ज्ञाने० ॥ ३ ॥

परमानंदीं समाधि ।
आनंदिस ना उपाधि ।
ज्ञानामृत प्राशुनि या ।
प्रभुपायीं रमत गात ॥ ज्ञाने० ॥ ४ ॥

१-९-४४

## दाखवील सुपथ तुला

( चाल–गोड काय चंद्रकोर )

दाखवील सुपथ तुला सद्गुरू खरा ।
कलियुगि या भक्तिमार्ग सुलभ हा बरा ।। धृ० ।।

व्रत उपवासादिक तें, सांग घडति ना ।
भगवें तें वस्त्र करीं, तव विडंबना ।
दांभिकपण जगिं न टिके, जाण पामरा ।।दाख०।। १ ।।

आशा ती बसलि मनीं ठाण मांडुनी ।
वरवर मग काय होय, मुंड मुंडुनी ।
संकल्पा देउं नको, आसरा जरा । दाख० ।। २ ।।

संन्यासकर्मविधी, बिकट फार हा ।
सुलभ राजमार्ग जगीं भक्तियोग हा ।
सांगे श्रीकृष्णसखा, पार्थ नरवरा ।। दाख० ।। ३ ।।

आनंदी शरण रिघे सद्गुरूपदीं ।
करुणाघन वर्षतील, ना कळे कधीं ।
चातकसम ध्यास मना, लागला पुरा ।। दाख० ।। ४ ।।

३-२-१९

## श्रीरंगा कोमलांगा

( चाल– देशाला देव माना )

श्रीरंगा कोमलांगा तूं धांवे अतां ॥ धृ० ॥
स्कंधीं कर ठेवुनिया ।
राधे चल कुंजवनीं ।
वदसि, आलें तुजसह मी ।
फसवोनी जासि कोठें हे नंदसुता ॥ श्रीरंगा० ॥ १ ॥

बकुलवृक्षडाहळितें ।
वांकविलें त्वां म्हणुनी ।
तोडितसे सुमनें मी ।
चकवोनि दृष्टि माझी कां जासी अतां ॥ श्रीरंगा० ॥ २ ॥

अंकीं मज घेऊनि त्वा ।
शिरिं सुमना गुंफियलें ।
प्रेमें मन मोहियलें ।
एकटि मी प्रिय तुजसि हा गर्व वृथा ॥ श्रीरंगा० ॥ ३ ॥

विरहि राधिका ती पुसे ।
आम्र बकुल मालतिला ।
कृष्ण कुठें देखियला ।
झणि सांगा, सोसवेना ही विरहव्यथा ॥ श्रीरंगा० ॥ ४ ॥

श्रांत अशी नदिपुलिनी ।
बैसे हरिध्यान धरुनी ।
हळुं हळुं मग ये मागुनी ।
झांकितो नेत्र राधेचे, हरी तो स्वतः ॥ श्रीरंगा० ॥ ५ ॥

राधेसी हृदयिं धरी ।
प्रेमभरें चुंबि हरी ।
प्रिय मज तूं एक खरी ।
झणि शंका सोड, आतां कां शोक वृथा ॥ श्रीरंगा० ॥६॥

१०–५–२३

## प्रभुवर देऊं मी काय तुला

प्रभुवर देऊं मी काय तुला ।
माझें मजजवळीं नच उरलें ।
खचितचि कांहीं मला ।। धृ० ।।
वृक्षांतिल अश्वत्थामाजी ।
सुमनांच्या सौगंधि वसे जी ।
चिद्शक्ती तेजांत दिव्य जी ।
वदसी विश्वीं मी भरलेला । देऊं मी काय० ।। १ ।।
चित्त तुझ्या ध्यानीं रत झालें ।
नामिं तुझ्या जिव्हेचे चाळे ।
करद्वय हें तव पदीं जुळलेलें ।
उरले कांहीं नसे मजला । देऊं० ।। २ ।।
जिवाशिवाची जडली समाधी ।
विटे प्रपंचीं तुटे उपाधी ।
मी-तूंपणाची सरली व्याधी ।
आनंदीआनंदच भरला । देऊं मी० ।। ३ ।।

१५-१०-४५

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

## चि. पद्मास

( चाल—प्रेमा उठ )

पद्मा, हांस, तूं हंसून हंसव जगास ॥ धृ० ॥
प्रीतीचें हें रम्य सरोवर ।
त्यामाजीं या नलिनी लतेवर ।
डोलतसे ही कलिका सुंदर ।
नूतन ये जन्मास ॥ १ ॥
दिसते जरि ही अजि मुग्ध कळी ।
हंसेल गालीं रम्य सकाळीं ।
पसरिल गंधच दूरवरी ही ।
उमलुनि अनिलदलास । तूं हांसून ॥ २ ॥
ज्ञानसूर्य तुज पूर्ण विकसवो ।
सत्कीर्तीचा परिमल देवो ।
सतत सुखी तुज प्रभू ठेवो ।
हीच मनींची आस । तूं हांसुन० ॥ ३ ॥

५-११-४३

[library stamp]

## कीर्तीस

( चाल–प्रेम कोणीही करीना )

दूर नेसी कां प्रियाला, साजणी तू सांग ना गे
साजणी तूं सांग ना ॥ धृ० ॥

ठेविला विश्वास जो मीं, तो तुवा केला निकामी ।
अंतरीच्या वेदना मी, साहुं कैशा सांग ना गे
साजणी तूं सांग ना ॥ १ ॥

दूर तूं होतीस जेव्हां, दाखवूनी स्नेहभावा ।
साधिला तूं काय दावा, हा तुझा कावा कळेना ।
साजणी तूं सांग ना ॥ २ ॥

आजवरी एकमेकां, ना विसंबू क्षणहि जें का ।
वागती आतां असे कां, येइ शंका ही मना गे ।
साजणी तूं सांग ना ॥ ३ ॥

कीर्ति बाई दोष कोणा, स्त्रीस्वभावा काय याना ।
पुरुषजाती ही अशी कां, शोधितो मधु भृंग नाना ।
साजणी तूं सांग ना ॥ ४ ॥

२३–१०–४२

नों. नं. ११८८०७ ११८८७

## हांस जरा तूं हास गड्या

( चाल–उमल जरा तूं उमल जरा )

हांस जरा तूं हांस गड्या । माझ्या हृदयीच्या रम्य फुला ॥ धृ० ॥

उघड उघड तव नेत्रकमल हें ।
तोषवि मानसभृंग जरा । माझ्या० ॥ १ ॥
प्रेमजळाचें सिंचन करि मी ।
हळुच उमलवी अधरदला । माझ्या० ॥ २ ॥
बोल बोबडा एक तरी वद ।
मुरक मुरक ती मान जरा । माझ्या० ॥ ३ ॥
वितरवि तव यशगंध महीवर ।
मोदभरें जग डुलव जरा । माझ्या० ॥ ४ ॥

१०–५–३६

## करि बाळे जो जो गाई

करि बाळे जो जो गाई । अंगाई गीत मी गाई ।। धृ०

पालख तुजला, करकमलांचा ।
मऊ बिछाना वात्सल्याचा ।
(चाल) सकलांच्या मायेची दुलई ।
करि पांघरुनि अंगाई ।। करि० ।। १ ।।

अनुदिनीं वाढे जणुं चंद्रकला ।
निजलीलेनें तोषवि सकला ।
(चाल) कोमल, मंजुळ गुंजारव तव ।
कधि अमुच्या कानीं येई ।। करि० ।। २ ।।

जणुं ईशाचा बगिचा फुलला ।
भूषवि नूतन सुमनलतेला ।
(चाल) वंशवेलिवर डोलत कलिका ।
ही कोमल बाला पाही ।। करि० ।। ३ ।।

१-८-४७

## बांसरि तव गोड गोड

बांसरि तव गोड गोड, लावी जीवास वेड ॥ धृ० ॥
पतिसुतगृह त्यागियले ।
तुज धुंडित वनिं फिरलें ।
एक तुझ्या, संगतिची ।
लागे जीवास ओढ ॥ बांसरि० ॥ १ ॥
वाजविसी, मधुवनांत ।
चित्त तेथ तनु गृहांत ।
बावरलें मन नितांत ।
जनतेची मज न चाड ॥ बांसरि० ॥ २ ॥
स्वस्वरुपीं मज दिससी ।
तूं माझा मीहि तुझी ।
या भोळया राधेचें ।
पुरवियलें बहुत कोड । बांसरि० ॥ ३ ॥

१-८-४५

# धिःकार उदरिं तव जन्म मम जाहला

( चाल–दत्तपदिं ध्यान धरि )

धिःकार उदरिं तव, जन्म मम जाहला ।
निंदिती सकल जन, पापिणी गे तुला ॥ धृ० ॥
मृत्युवश करि पती ।
ऐशि तव दुष्कृती ।
निजकरें भाळिचा ।
पुससि कुंकुमतिला ॥ धिःकार० ॥ १ ॥
राम सुकुमार वनिं ।
धाडिला डाकिणी ।
नरकसुख भोगविसि ।
राज्य देउनि मला ॥ धिःकार० ॥ २ ॥
भरत क्रोधें भरे ।
भान त्यातें नुरे ।
वदत त्वेषें अता ।
वधिन जननी तुला ॥ धिःकार० ॥ ३ ॥
कुलगुरू बोधिती ।
उचित नाहीं कृती ।
आवरी क्षोभ हा ।
भरत बाळा ॥ धिःकार० ॥ ४ ॥
नंदिग्रामीं भरत ।
रामनामीं रमत ।
बंधुप्रीती अशी ।
जगतिं विरळा ॥ धिःकार० ॥ ५ ॥

९-५-२४

## तो जीविचा विसावा ।

( चाल—आनंद कंद ऐसा )

श्रीराम नित्य ध्यावा । तो जीविचा विसांवा ।। धृ ० ।।
संसारिं सौख्य कोठें ।
जवमात्र; दुःख मोठें ।
क्षिण मात्र व्यर्थ व्हावा । तो जीवि० ।। १ ।।
नरदेह प्राप्त झाला ।
झणि लावि सार्थकाला ।
गंवसेल सौख्य ठेवा । तो जीवि० ।। २ ।।
अभयांस देत आर्ता ।
सकला जिवांस त्राता
सर्वेश तो स्मरावा । तो जीवि० ।। ३ ।।
कैवल्यधाम नामीं ।
आनंदि रंगे रामीं ।
हृदिं राम सांठवावा ।। तो जीवि० ।।४ ।।

७-५-३१

## हा दिनानाथ श्रीराम आधीं स्मरा

हा दिनानाथ श्रीराम आधीं स्मरा ।
देईल चित्सूख शांती नरा ॥ धृ० ॥
आलासि कोठोनि । जाणार कोठें ।
कांहींच तूं नेणसी पामरा ॥ हा० ॥ १ ॥
देही अहंभाव, नाहीं तुझें नांव ।
संसार निःसार, आहे खरा ॥ हा दिना० ॥ २ ॥
कामातिरेकें, विषयांध झालों ।
मोहून कांता, धना, मंदिरा ॥ हा दिना० ॥ ३ ॥
आसत्य सारें, खरें मानुनी ।
नाहीं तुला पूजिलें ईश्वरा ॥ हा दिना० ॥ ४ ॥
संसारडोहिं बुडालों अहा ।
काढी मला तूं दयासागरा ॥ हा दिना० ॥ ५ ॥
वाचे सदा नाम, डोळां तुझें ध्यान ।
लागो निदिध्यास हाची बरा ॥ हा दिना० ॥ ६ ॥
तुझें नाम गातां, हरे सर्व चिंता ।
आंनंदिआनंद दाटे खरा ॥ हा दिना० ॥ ७ ॥

४-३-२१

## अज्ञान निशेच्या ठाईं

( चाल—गुरुघरीं जातें माहेरीं )

अज्ञान निशेच्या ठाईं, बा मनुजा सावध राही ।।धृ०।।
संसारस्वप्न हें पाही
यांतुनि झणिं जागा होई ।
सुमनांसम यौवन तेंहीं ।
विद्युच्चल आयू पाही ।। अज्ञान० ।।१।।
काम क्रोध षड्रिपु शिरले ।
तस्कर तनु गेहीं लपले ।
ज्ञानरत्न त्यांनीं हारलें ।
सत्वर तूं जागृत होई ।। अज्ञान० ।।२।।
आशेनें बहु चिंतेनें ।
बद्ध होति जीव कर्मानें
क्षणभंगुर आयू जाणें ।
भ्रम मनिचा सोडुनि देई ।। अज्ञान० ।।३।।
नच माता बंधु पिता रे ।
नच गृह धन सुत कांता रे ।
तुज अंतीं सोडवि बा रे ।
कां बुडसी या भवडोहीं ।। अज्ञान० ।।४।।
जन्म जरा जाया दुःखें ।
पुरविती पाठही असुखें ।
संसारसागरीं दुःखें ।
राहिलीं भरूनि ऐशीं हीं ।। अज्ञान० ।।५।।
घातली गस्त ही गुरुनीं ।
जन जागृत व्हावे म्हणुनी ।
गोपाळसुतेच्या श्रवणीं ।
चिर नाद धुमतसे बाई ।। अज्ञान० ।।६।।

१-५-२८

## सहचारिणी जणुं गमली माते

सहचारिणी जणुं गमली माते ।
तरुसंन्निध ही वेली ॥ धृ० ॥

शुष्क शिशिर तापें ही झाली ।
झंझावातें जणुं बावरली ।
आश्रयास तुजजवळीं आली ।
सहवासास भुकेली । सहचा० ॥ १ ॥

उच्च ध्येय क्षण सारुनि मागें ।
कोमल करपल्लवि अनुरागें ।
वांटे हा तरू तिज कुरवाळी ।
आलिंगुनि वेल्हाळी । सहचा० ॥ २ ॥

प्रियसहवासें नाचे डोले ।
हांसति सुमनें मोहक बाळे ।
धन्य धन्य ती कृतार्थ झालो ।
प्रेमदवानें न्हाली । सहचा० ॥ ३ ॥

१०-५-४८

## वासंतिक समय गोड

वासंतिक समय गोड, चला सखिचें पुरवुं कोड ॥ धृ ०
वनदेवी ही नटली ।
जणुं हिरवा साज ल्याली ।
फलपुष्पें भारावलि ।
कोकिळ करि गान गोड । चल ० ॥ १ ॥
रुचती का द्राक्षजांभ ।
आवडतें काय सांग ।
पुरवूं तव इच्छित गे ।
कां धरिसी उगच भीड । चल ० ॥ २ ॥
हिंदोळ्यावरति बैस ।
हा हिरवा शालु नेस ।
पक्वान्नें भोजनास ।
बहुपरिचीं गोड गोड । चल ० ॥ ३ ॥
गर्भतेज अंगि चढे ।
हास्य तुझ्या वदनिं खुले ।
भरतां नव मास पूर्ण ।
पाहूं शिशु हींच ओढ । चल ० ॥ ४ ॥
बाळ गुणी हा छकुला ।
वाढो जणुं चंद्रकला ।
आनंदवुं सकलाला ।
देई प्रभु हीच जोड । चल ० ॥ ५ ॥

४-५-५२

## शिवपार्वती संवाद

( कोण कुठिल तूं खल कपटी रे )

कोण कुठिल तूं खल कपटी रे, जाई अतां इथुनी, झडकरी ॥ धृ० ॥

शूलि असे मी, उघडी द्वारा ।
तरि त्वां जावें वैद्यगृहाला ।
व्यथित नसे मी, निलकंठाला ।
नोळखिसी का गे, भामिनी ॥ कोण० ॥ १ ॥
मयुर असे मी, केकावलिते ।
करुनी दावी, मजला येथें ।
कां शिणवीसी, मज प्रिय कांते ।
पशुपति आहें मी, कामिनी । कोण० ॥ २ ॥
आश्चर्यासी नाहीं सीमा ।
पशुपति कां ये, अजि मम धामा ।
दिसति न शृंगें, कां नयनांना ।
मी न चतुष्पद गे, सुगुणी । कोण० ॥ ३ ॥
शिणें जीव हा, कथिता तुजसी ।
स्थाणु असें मी, उमजे चित्तीं ।
तरु खोडें तीं, कधि कां वदतीं ।
विस्मय मनिं वाटे, ऐकुनी । कोण० ॥ ४ ॥
सांभ वदे मी, कांत शिवेचा ।
विपिना सांडुनि, जम्बुक निशिचा ।
आश्रय कां करि, जनस्थानाचा ।
हें न कळे अजुनी, मन्मनीं । कोण० ॥ ५ ॥
करुनि निरुत्तर, ऐशा बोलें ।
गिरिकुमरीनें शंकर हरिले ।
प्रेमकलह हे, विसरा सगळे ।
गौरिहरा वदली, प्रार्थुनी । कोण ॥ ६ ॥

९-५-२१

## प्रेमें वदे विष्णुप्रति

( चाल--शामरंग नंदकुमरि० )

प्रेमें वदे विष्णुप्रती, लक्ष्मी सती ।
आपणांमधिं कवण थोर, मानिती क्षितीं ॥ धृ० ॥
पाहुं नको प्रचित अशी, सांगतों तुला ।
मानितील सकल क्षितीं, अधिक गे मला ।
हिरमुसली होशिल मग, खचित मागुती ॥ प्रेमें० ॥१॥
काय मला मानिती न, या महीतलीं ।
शक्य न ही गोष्ट कदां, मानवा भुली-।
पाडिन मी, योगियांची, चलित करि मती॥ प्रेमें० ॥२॥
नारायण नाम धरुनि, नगरिं पातला ।
राममंदिरांत पुराणीक जाहला ।
आत्मज्ञान गुह्यजनां, बोधितो अती ॥ प्रेमें० ॥३॥
लावुनि निज भजनिं जनां विरक्त बनवुनी ।
स्वप्रताप दावि म्हणे, सिंधुनंदिनी ।
जरठ रूप धरुनि येत एका सदनिं ती ॥ प्रेमें० ॥४॥
वाढि म्हणे फार क्षुधा लागली असे ।
गृहकामिनि वदत बये वेळ मज नसे ।
अंतरेल मन पुराण-श्रवण मागुती ॥ प्रेमें ॥५॥

सर्व ठायीं ईश असें नित्य ऐकुनी ।
मम क्षुधा न करिसि शांत, केवी ती क्षणीं ।
आणुनि दे खाद्यपात्र, गृहिणि तिज हातीं ।।प्रेमें० ।।६।।
वृद्धे करि पात्र कनकमयचि जाहलें ।
बघुनि चकित होय तिनें भान हरपलें ।
श्रवण मनन कैचें मग मोहिली मती ।। प्रेमें० ।।७।।
प्रसृत ही जाहलिसे, गोष्ट तत्क्षणीं ।
सन्मानुनि नेति कितिक वृद्ध कामिनी ।
धनमोहें खाद्यपेय तिजसि अर्पिती ।। प्रेमें० ।। ८ ।।
राम मंदिरांत सर्व शून्य जाहलें ।
श्रोतृवृंद पार कुठें सर्व लोपले ।
लक्ष्मीनें मोहियली, अमित जनमती ।। प्रेमें० ।। ९ ।।
निजपतिस विजयवती कमलजा पुसे ।
आतां तरि कोणि पणां जिंकिलें असे ।
आनंदी प्रेमकलह ग्रथि यथामती ।। प्रेमें० ।। १० ।।

७-४-२१

## विमल करी मन हें आधीं

( चाल–हरिभजनाविण काळ )

विमल करी मन हें आधीं, सांगणें तुला रे ॥ धृ० ॥
स्नानदान पूजनविधी ।
नित्यकर्म चुकविन कधीं ।
अहंभाव ही उपाधी ।
अंतरीं नको रे । विमल० ॥ १ ॥
त्यागुनिया सकल भोग ।
ध्यानधारणादि योग ।
आचरि हें सकल सांग ।
सिद्धिलागि बा रे । विमल० ॥ २ ॥
गुरुबोधा श्रवण करुनि ।
पावन जरि म्हणसि मनीं ।
चित्तशुद्धिवीण खूण ।
सांपडेन बा रे । विमल० ॥ ३ ॥
षड्रिपु निवटूनि प्रथम ।
अपपर मति करिन जतन
प्रणत मनें गुरुसि शरण ।
जाय करि त्वरा रे । विमल० ॥ ४ ॥
भव–भय तें हरुनि सकल ।
दावि ब्रम्हस्वरुप विमल ।
नमि सद्गुरुचरणकमल ।
गोपाळज़ा रे । विमल० ॥ ५ ॥

४–६–२०

## आजि भाग्य माझें आलें फळा

आजि भाग्य माझें आलें । फळा ।
गुरुमाउली मी देखियेलि डोळा ॥ धृ ० ॥
फिरुनि बहुत योनी ।
जीव भागला रे ।
दाविल तोचि मार्ग मला ॥ आजि ० ॥ १ ॥
विसरुनि त्यातें ।
आशापाशीं ।
गोवियला मीं माझा गळा ॥ आजि ० ॥ २ ॥
भवसागरिं या ।
नाविक बनुनी
परतिर दाविल, तोचि मला ॥ आजि ० ॥ ३ ॥
आनंदि मनीं ।
निश्चय दृढ हा ।
सद्गुरु तोचि, तारी मला ॥ आजि ० ॥ ४ ॥

१-३-२२

# धरि मनिं रघुनाथ ध्यास

( चाल–भज भज भव जलधि माजि० )

धरि मनिं रघुनाथध्यास, भव तरावयाला । धृ० ॥
संसारीं शिणुनी काय ।
शेवटीं परि हाय हाय ।
किमपि नसे सौख्यद हें
मानवा तुला ॥ धरि० ॥ १ ॥
नश्वर हें सकळ जगत ।
काळमुखीं गडप होत ।
शाश्वत परि गणुनि सत्य ।
शिणविसी जिवाला ॥ धरि० ॥ २ ॥
धनसुतदारादि स्वजन ।
सोडवि तुज अंतिं कोण ।
मृत्यू ग्रासि क्षणिं म्हणोन ।
स्मरत जा प्रभूला ॥ धरि० ॥ ३ ॥
करुनी संसार नीट ।
साधी परमार्थ बिकट ।
रामदासवचन प्रकट ।
दृढ धरी मनाला ॥ धरि० ॥ ४ ॥
शमवुनि भवताप जाण ।
जडवी तव चरणिं प्राण ।
आनंदी याचि दान ।
हेंचि रे दयाळा ॥ धरि० ॥ ५ ॥

४-५-२१

## सद्गुरुनाथ दयाळा

( चाल–होईल कलह म्हणोनि )

सद्गुरुनाथ दयाळा, वंदन भावें करित तुम्हांला ॥ ध्रु० ॥
गमत अजी हा सुदिन उदेला ।
तनुमन जडलें गुरुभजनाला ।
पूर्वसुकृतें लाभ जहाला ।
लोलुप मनभृंग पदकमलाला ॥ सद्गुरु० ॥ १ ॥
जग हें नश्वर देखुनि डोळा ।
कळलें परि तें नवळे मनाला ।
षड्रिपु जाळिती देहगृहाला ।
अभिसिंचन करि नाम सुधेला ॥ सद्गुरु० ॥ २ ॥
निर्माण कोणीं जग हें केलें ।
चालक त्राता कोण हें कळलें ।
तत्त्वमसि हें तत्व उमजलें ।
काय ही गुरुची, अघटीत लीला ॥ सद्गुरु० ॥ ३ ॥
हृदयसिंहासनीं श्रीगुरुमूर्ती ।
स्थापुनि ओवाळुं प्राणज्योती ।
भवरोगाची झाली शांती ।
आनंदीआनंद होत मनाला ॥ सद्गुरु० ॥ ४ ॥

८–१०–२०

## सकल योगाहुनि जाणा

( चाल--हे सुरवरा नंदबाळा )

सकळ योगाहुनि जाणा । नाम योग हा सुलभ कलियुगीं ।
संतें कथिला पथ भवतरणा ॥ धृ० ॥
उपवासादि व्रतवैकल्यें ।
यांहीं तनुतें विगलित केलें ।
म्हणुनि स्वरूपीं चित्त जडेना ॥ सकळ० ॥ १ ॥
हरिनामीं मन तन्मय होतां ।
विषय-विस्मृती पडते चित्तां ।
मग कशास्तव ध्यान-धारणा ॥ सकळ० ॥ २ ॥
हरिभजनांच्या प्रेमोल्लासें ।
कुंडलिनीचे सुटती वळसे ।
मग कां सेविसि प्राणायामा ॥ सकळ० ॥ ३ ॥
नामें तरल्या त्या जडशीळा ।
वाल्या कोळी वाल्मिक झाला ।
हा नामाचा अगाध महिमा ॥ सकळ० ४ ॥

९-५-२१

## जो जो रे जो जो आत्मारामा

जो जो रे जो जो आत्मारामा,
हलवी सुबुद्धी माता तुजला ।। धृ० ।।
तुज निर्गुणाचा, पाळणा आणिला ।
नवविध भक्तीनें, सुदृढ विणिला ।
चहुं मुक्तीचे खूर चारी बाजूला ।
शांतीचा बिछाना, मऊ अंथरिला ।। जो जो० ।। १ ।।
चौदा विद्या चौसष्ट कला ।
खेळणें बांधिलें तुजवरि बाळा ।
त्यामाजी मोहक परब्रह्मगोळा ।
लक्षुनि खेळे तूं स्वानंदें बाळा ।। जो जो० ।।२।
माया तंव ही तुजला भुलवी ।
आत्मप्रचीती हुंकार देई ।
ब्रह्मानंदें रंगुनि जाई ।
लागो दे तुजसी निद्रा समाधी ।। जो जो० ।। ३ ।।
ऐसें हें शिशुपण दुर्मिळ भुवनीं ।
संपादी बा गुरुकृपेंकरुनी ।
घेइल अंकीं तुज जैसी जननी ।
आनंदी भावें नत गुरुचरणीं ।। जो जो० ।। ४ ।।

५-६-२३

## तूं वद वद रसने वेगें

( चाल–त्यजि भक्तांसाठीं लाज )

तूं वद वद रसने वेगें, श्रीरामनाम सुखदायी ॥ धृ० ॥
संसारतरू अफाट । वाढला वृक्ष घनदाट ।
प्रेमाचीं मधुर फळें, त्यांत ।
मन सदा हें गुंतुनि राही । तूं वद० ॥ १ ॥
नश्वर जग ठाऊक असतां ।
परि सोडिना ही ममता ।
पाहुनिया धनसुतकांता ।
हें मन लोलुप होई । तूं वद० ॥ २ ॥
हे आप्त स्वजन माझे ।
वाहिलें भ्रमाचें ओझें ।
परि अंतीं कोणि न येई ।
एकलेंचि जाणें पाहीं । तूं वद० ॥ ३ ॥
घडि घडि हें आयू जाई ।
हा काळ चोरुनि नेई ।
प्रभुराया तुजविण अंतीं ।
मग कोणि नाहीं नाहीं । तूं वद० ॥ ४ ॥
हा बोध मानसीं ठसला ।
हृदयांत रामप्रभु दिसला ।
भवचिंता ने विलयाला ।
श्रीराम राम मुखिं गाई । तूं वद० ॥ ५ ॥

३-४-२७

## हरि वाजवी मधुवनांत वेणू

(चाल–फुलबाग शोभा पाहूं ग )

हरि वाजवी मधुवनांत वेणू ।
मोहिलें मन मोहिलें ॥ धृ ॥
उषा निशेते, वदे ग सखये ।
वृंदावनिं चल झणीं गडे ॥ हरि ० ॥ १ ॥
कांहीं सुचेना गृहधंदा मज ।
पाहिन मोहन कधीं गडे ॥ हरि ० ॥ २ ॥
मधूमालती, शेवंति चल ग ।
राधा गौळण निघे पुढें ॥ हरि ० ॥ ३ ॥
किती सख्यांनो, विलंब करितां ।
धीर न धरवे, आतां गडे ॥ हरि ० ॥ ४ ॥
व्रजांगना मधुवनांत आल्या ।
गाती नाचति प्रेमभरें ॥ हरि ० ॥ ५ ॥
हरी दशदिशा भरोनि उरला ।
आनंदीआनंद गडे ॥ हरि ० ॥ ६ ॥

५-७-२९

## होळी

पाहतोस चंद्रमा, वरुन काय खालीं ।
जगत सकल होरपळत धडधडेच होळी ॥ धृ० ॥
अग्निकुंडि यजिति यजन, जीव अमित थोरसान ।
घालिति जणुं थैमान, रौद्र स्वरूप कालीं ॥ १ ॥
गमति विश्वमुखीं शिरती, अतिरथि महारथी ।
भिउनी पार्थ स्तब्ध उभा, तीच वेळ आली ॥ २ ॥
मिरविसी नभीं वैभवांत अंधारच जनमनांत
झांकी मुख अभ्र पेट, घेई शाल काळी ॥ ३ ॥

९-३-४४

# भिल्लीण वेषधारी पार्वती-शिवसंवाद

( चाल—कूज्य देशीं श्यामबाला )

तापसा तूं घोर वनि या केंवि तप हें आचरीसी ?
कामदीप्ती हृदयिं असुनी वृथा देहा कष्टवीसी ॥ धृ० ॥
सुंदरी गे फीर मागें, जीव विरहानलें पोळे ।
अंगने तूं नृत्यगानें मोहियेलें मदनरिपुसी ॥ १ ॥
प्रियतमेतें टाकुनीया परस्त्रीचा लोभ धरिसी ।
मनुज-वृत्ती सोडुनि कां, पशूसम तूं वर्ततोसी ? ॥ २ ॥
सारिपाट खेळतांना गिरीकुमरी हरी मातें ।
म्हणुनि चित्तीं क्षोभ येई पातलों या काननासी ॥ ३ ॥
आदि माया अंबिकेतें सांडुनी जो वनीं भ्रमसी ।
मज ऐशा भिल्लिणी ते खचित मग तूं काय गणिसी ॥४
किति पहासी अंत माझा म्हणुनी धरिले पालवासी ।
भिल्लिणीच्या जात मागें भान नुरलें त्या हरासी ॥ ५॥
भिल्लिणीचा वेष धरुनी, उमा आणि पती सदनीं ।
सांब लज्जायुक्त स्वमनीं, अति उल्हास अंबेसी ॥ ६ ॥
कलहरोषां विसरुनीयां, सुखवि गिरिजा महेशासी ।
आनंदीआनंद दाटे, नमितसे त्या उभयतासी ॥ ७ ॥

१-१२-२९

# गौळण

( चाल–या नव नवल )

मी कुलयुवति गोपाङगना, येउं नको हरि
तूं मम सदना, करितो मम पति छल ना ।। धृ० ।।
क्रोध श्वशुर हा सासु वासना, गांजितातित तें मज सोसेना।
छंद तुझा हरि मन सोडीना ।
गृहधंदाहि सुचेना ।। मी कुलयुवति ।। १ ।।
मद मत्सर हे दीर दुर्मती । छळिती मजला अनेक रीतीं ।
परि मम हृदयीं प्रभु तव प्रीती ।
तिळभरहि ढळेना ।। मी कुलयुवति ।। २ ।।
असुया तृष्णा नणदा कुमती । काम पतीसी बोधिती ।
नंद सुतावरि मोहिती ललना ।
करि तिजसी ताडना ।। मी कुलयुवति ।। ३ ।।
शांती माता, विवेक जनिता । संकटकालीं धांवुनि येतां ।
आनंदीची सरली चिंता ।
भवव्याधी जाचेना ।।मी कुलयुवती ।। ४ ।।

१०-११-३३

## शबरी

( चाल–मधुर किती कुसुम गंध सुटला )

पुनित करी पर्णकुटी रघुराज ।
बहु दिवसाचा या शबरीचा । पूर्ण मनोरथ आज ॥ धृ० ॥
पूजुनि प्रेमें भिल्लि म्हणे ती ।
भक्षी बदरी फळास । पुनित ॥ १ ॥
राम वदे, हीं मज पक्ष्यांनीं टोंचिलिं ।
गमती मनास पुनित ॥ २ ॥
आम्ल कटू नच; मधुर अशीं मी,
चाखुनि ठेवि तुम्हांस । पुनित ॥ ३ ॥
निस्सिम भक्ती पाहुनि सेवित,
प्रभु तो बदरिफळांस । पुनित ॥ ४ ॥
गोपालाची बाला नमि त्या ।
रघुवीर-पदकमलास । पुनित ॥ ५ ॥

१३–३–३४

## प्रभुजी मी खचित उणा

प्रभुजी मी खचित उणा । तव कृपाबळाविना । ॥ धृ ०॥

हा मानवजन्म मिळे ।
काय कशास्तव न कळे ।
आठवीन तुजसि जरी ।
देसी विभो ज्ञानधनां ॥ प्रभु ० ॥ १ ॥
वास किती भूवरती ।
काय पुढें होय गती ।
दाटला घनांधकार ।
साहवेन कल्पना ॥ प्रभु ० ॥ २ ॥
भक्तीची करि पणती ।
पाजळोन दिव्यज्योती ॥
देत सुप्रकाश पथीं ।
मग सरे विवंचना ॥ प्रभु ० ॥ ३ ॥
तव कृपाबळें न काय ।
नर नारायण हो जाय ।
संत सांगतील सोय ।
सुलभ मार्गदर्शना ॥ प्रभुजी ॥ ४ ॥

९-९-५२

# कृष्ण-सत्यभामा संवाद

(चाल-तिळगुळ घ्या मंजुळ बोला )

द्वारीं कोण निशिसमयींचा करि आघात अंगुलीचा ।। धृ ।।

कुटिले मी गे माधव आहें ।
उघडी द्वारा तूं लवलाहे ।
वसंत तंरि मग येथुनि जाये ।
उद्यानीं शोभसि साचा । करि ० ।। १ ।।

चक्रि असे मी उघडी द्वारा ।
काय काम रे सांग कुलाला ।
कुलाल नोहे धरणिधराला ।
नोळखसी विस्मय याचा । करि ० ।। २ ।।

सर्प तरि मग जाई रानीं ।
ओळख कालियरिपु मी स्वमनीं ।
खगपति जरि मग जा येथुनी ।
धरि मार्ग तूं गगनपथाचा । करि ० ।। ३ ।।

हरि आहे मी जाणी कांते ।
येसि मर्कटा काय निमित्तें ।
सुफळित ऐशा जा विपिनातें ।
करि कुंठित मार्ग हरीचा । करि० ।। ४ ।।

प्रतिवचनें हरि जिंकी भामा ।
तोच प्रभु संरक्षो आम्हां ।
गोपालाचि बाला दीना ।
दे आश्रय तूं निजपदिंचा । करि ० ।। ५ ।।

१३-७-२

# मुरली

( चाल--भज भज भवजलधि० )

थांबवि मधु मुरलिगान । कुंजवनविहारी ।। धृ० ।।

जातां मी यमुनेतटीं ।
आले मम श्रवणपथीं ।
देहभान विसरवि तव ।
मधुर बांसरी ।। थांबवि० ।। १ ।।

रात्र होति दोन प्रहर ।
नाद भरे श्रवणिं मधुर ।
पति सुत गृह रुचति न हीं ।
घेइ मन भरारी ।। थांबवि० ।। २ ।।

श्रीहरि तव मुरलि-गान ।
विश्वाचें नुरवि भान ।
आनंदी होत विलिन ।
नादीं त्या मुरारी ।। थांबवि० ।। ३ ।।

१०-५-२४

## कृष्णक्रीडा

( चाल--किति मजेदार हार० )

किति मनोहार रूप, सगुण स्वरूप, गुणनिलय,
अखिल जगिं करितो वास ॥ धृ० ॥
पाहुं या तया प्रेमभरानें ।
मन मोहियलें मुरलिरवानें ।
(चाल) कंसारी, भवहारी, सुखकारी ।
प्रेमानंदें, नाचू सकळहि, आनंदें करूं जयजयकार ॥१॥
गोपबाल घेउनि कंसारी ।
यमुनातटिं जो धेनू चारी ।
(चाल) गोपिनाथ, करिं दहिंभात, कवळ मुखांत ।
घाली प्रेमानंदें, व्रज शिशु, उपवनिं क्रीडति अहा मजेदार ॥२॥
अवलोकाया कृष्ण मुरारी ।
विमान पंक्ती दाटति अंबरीं ।
(चाल) सुरललना, मधुसुदना, मनमोहना ।
पंच्चारति, ओंवाळिति भावें, सुरवर वर्षति सुमसंभार ॥ ३ ॥
आनंदी परब्रह्म प्रभूला ।
प्रणति करी जोडुनि करयुगुला ।
(चाल) तव स्तवनीं, गुणगानीं, मोद मनीं, ।
उपजवि दृढ, मम हृदयिं वसति करि, हींच मनाची
पुरवी आस ॥ ४ ॥

७-८-२३.

## प्रभुजी मानुं किती आभार

प्रभुजी, मानुं किती आभार ।
तुझ्या कृपेचें नेईल तारू ।
उतरुनि मज भवपार । प्रभु ० ।। धृ ० ।।
सुदृढ सुंदर मानव काया ।
दिव्य नेत्र हे तुला पहाया ।
मधु रसना ही तुज आळवाया ।
फेडूं कसे उपकार ।। प्रभु० ।। १ ।।
पतिसुख वैभव नित सुखवाया ।
कवण्या पुण्यें दिधलें देवा ।
अनंत हस्तें सजळा द्याया ।
दों करिं मी घेणार ।।प्रभु० ।। २ ।।
शाश्वत चिर सौख्याचा ठेवा ।
तव भक्तीचा मजला द्यावा ।
ऐकव तव अधरींचा पावा ।
जो तन्मय करणार ।। प्रभु० ।। ३ ।।

१५-८-४०

## सहज आलें या रम्य काननाला

( चाल–उठ यदुराया उशिर होय भारी )

सहज आलें या रम्य कानकाला ।
बकुल अशोकाला
सुमन बहर आला । सहज ०॥ धृ० ॥
वांकवुनि करें ।
डहाळि तोडितां फुलें ।
मृगा दुरुनि देखिलें ।
तोंचि जवळि आला ॥ सहज ० ॥ १ ॥
कनक कांतिनें ।
हरिण शोभतो अती ।
अहा रम्य तनु किती ।
मोहि मन्मनाला । सहज ० ॥ २ ॥
कनक मृग वनीं ।
बघुनि मोहिली सीता ।
रिपु कपटनिर्मिता ।
फसलि मोहजाला । सहज ० ॥ ३ ॥

१-७-२१

नों. ९१८८०४ ११।१२।५३

# सावित्री

( चाल--जय जय जय मुनिराज )

जय जय नृपदुहिते, सावित्री जननी ।
सत्यवान पतिसह तें वंदन तुज रमणी ॥ धृ० ॥
मद्रपुराधिपती, अश्वपती–जाया ।
प्रसवे सावित्रीच्या, वरदानें तनया ।
कालें उपवर झाली, ती सद्‌गुण खाणी ।
धाडी वर शोधाया, अश्वपती नृमणी ॥ जय० ॥ १ ॥
परिजन संगें घेउन, हिंडे बहु देशीं ।
आरामास्तव थांबे, एका कुटिपाशीं ।
द्युमत्सेन निवासा, करि स्व–स्त्रीसहित ।
विपिनीं कंठी दिन तो, पुत्रासमवेत ॥ जय० ॥ २ ॥
अवलोकी सावित्री, त्या गुणि युवकातें ।
रुचला पति तो तिजला, वरि मग मनि त्यातें ।
हर्षें मग ती परते, पातलि निजनगरा ।
सद्‌भावें वंदियलें, निज मातापितरां ॥ जय० ॥ ३ ॥
वृत्त तियेसी प्रेमें, नृपती जंव पुसतो ।
अवचित तेथें प्रगटे, नारद मुनि तव तो ।
करिं धरुनी सन्मानें, बैसविलें आसनीं ।
अर्घ्यें पाद्यें पूजी, मधुपर्कें करुनी ॥ जय० ॥ ४ ॥
नृप बोले दुहितेसी, वरिला कोण मनीं ।
विदित करी गे सर्वहि, लज्जा मनीं न गणी ।
बोले सस्मितवदना मुनिवर्या नमुनी ।
द्युमत्सेनसुतातें, वरिलें आर्या मीं ॥ जय ० ॥ ५ ॥

ऐकुनि बोल तियेचे, ठेवी कर कर्णी ।
खिन्नमनें मुनि वदला, अनुचित ही करणी ।
नृपती बोले मुनितें, विस्मित होवोनी ।
वद मजला झणि कैसी अनुचित ही करणी । जय०॥६॥

सकल गुणान्वित जरि तो, अल्पायू आहे ।
संवत्सर जातांचि, यमसदनां जाये ।
परिसुनि मुनिवाक्यातें, भूपतिला वदला ।
अन्य वरातें वरि जो तव मतिसी रुचला । जय० ॥७॥

यावरि बाला वदली, अन्या मी न वरी ।
वाहियले ज्या प्राणां त्याची मी नवरी ।
परिसा सकलहि तुम्ही दृढनिश्चय माझा ।
तदितर वर तो मजला, तातासम समजा ॥ जय० ॥ ८ ॥

भूपसुतेचा निश्चय देखुनि मुनि वदला ।
त्यासचि दे कन्या, हें उचित गमे मजला ।
मुनिवाक्यें त्या भूपें, दिधली निज पुत्री ।
द्युमत्सेनसुतातें, विधिपूर्वक मग ती ॥ जय० ॥ ९ ॥

सासू-श्वशुरा सुखवी, निजकृतिनें पतिला ।
विपन्नावस्थेचा, खेद न मुळिं तिजला ।
नित्य झुरे ती स्मरुनी नारदवचनाला ।
आयू त्रीदिन उरतां करि उपवासाला ॥ जय० ॥१०॥

ज्येष्ठ शुद्ध पौर्णिमेदिनीं रवीउदयीं ।
कंदफलास्तव रानीं निघतां पति विनवी ।
कर जोडुनि सति वदली, जाऊं नका नाथा ।
जातां, तरि संगें न्या, ही आपुली कांता ॥ जय०॥ ११ ॥

विगलित तनु तव झाली, उपवासेंकरुनी ।
श्वशुराज्ञा घेउनि ये, येसी जरि रानीं ।
विपिनीं स्त्रीसह गेला, काष्ठि घाव घाली ।
उठला शूल कपाळीं, मग उतरे खालीं ॥ जय० ॥ १२ ॥

असह्य शूल हा उठला, मस्तकिं मम कांते ।
घेई मस्तक अंकीं, वदला मग तीतें ।
निज लोकां सोडुनि तो, भानुपुत्र आला ।
सत्यवान् प्राणाचें हरण करायाला ॥ जय० ॥ १३ ॥

धैर्यें पृच्छा करिती, कवण तुम्ही आला ।
मम प्रिय प्राणपतीचे, प्राण हरायाला ।
यम म्हणती मजला गे, नेतो तव पतिला ।
जा शव घेउनि आतां, करि उत्तरकृतिला ॥ जय० ॥ १४ ॥

हरुनी प्राणा त्याच्या, निजमार्गें चाले ।
ठेउनि शव भूवरि सति, त्यामागें चाले ।
मागें परतुनि पाहे, बोले यमधर्म ।
उगाच शिणसी बाळे, व्यर्थ न घेई श्रम ॥ जय० ॥ १५ ॥

पतिसह असतां कैचे, श्रम होती मजला ।
पति जिकडे तिकडे सति, धर्म असा कथिला ।
बाले या तव बोले, प्रेमा ये भरतें ।
मागे इच्छित वर गे, देतों मी तूंते ॥ जय० ॥ १६ ॥

प्रथम वरानें मागे श्वशुराच्या नयना ।
द्वितियवरें ती मागे, राज्य तयासि पुन्हा ।
शंभर सुत ताता द्या, तिसरा वर मागे ।
तीन वर जरी दिधले, तरि ही त्या मागें ।।जय०।।१७।।

चवथा वर तुज देतों, जा मागें आतां ।
प्रसन्न होऊनि शतसुत, द्या मजसी ताता ।
तथास्तु वदला भुलला, यम सतिच्या बोले ।
पतिपुत्रासह नांदे, चार शतें बाले ।। जय ० ।। १८ ।।

परिसुनि मग सावित्री, शवानिकट आली ।
अंकीं घेउनि शिरतें, सति तेथें बसली ।
हळु हळु त्या जड देहीं संचरला प्राण ।
सत्यवान झाला, सावध संपूर्ण ।। जय ० ।। १९ ।।

मोदें पतिला वदली, सदनिं चला आतां ।
उशिर होय बहु गेला, अस्ताचलिं सविता ।
मातापितरे कुटिरीं, चिंतातुर झालीं ।
पुत्रस्नुषेतें पाहुनि, आनंदें धालीं ।। जय ।। २० ।।

यमवरदानें श्वशुरा, राज्य–नेत्र आले ।
सावित्रीच्या पुण्यें दुर्दिन तें सरले ।
उभयकुला उद्धरि, सावित्री तिजला ।
वंदुनि सौभाग्या दे प्रार्थू हें सतिला ।। जय० ।। २१ ।।

गाती ज्या वनिता हें, चरित्र दिनरजनीं ।
धनसुतसौभाग्यातें, पावति या अवनीं ।
सत्यवान सावित्री, यमधर्मा नमुनी ।
आनंदी गाई हें चरित्रदिन रजनीं ।। जय० ।। २२ ।।

१–८–२९

## विश्वजननी श्रीभवानी.

( चाल—पांडवा सम्राट पदाला. )

विश्वजननीं श्रीभवानी, शरण चरणीं येत मी ।
शारदे तूं काव्यदेवी, देइ स्फूर्ती मन्मनीं ।। धृ० ।।
मयुरसिंहासनिं बसोनी ।
वाजविसी करिं विणा गे ।
आदिमाये स्वामिनी ।। विश्व० ।। १ ।।
वेदमाते या जगातें ।
वर्तवीसी तूं शुभांगे ।
ब्रह्मतनये मोहिनी ।। विश्व० ।। २ ।।
काव्यस्फूर्ती देइ माते ।
याचना ही करि आनंदी ।
लीन चरणीं होउनी ।। विश्व० ।। ३ ।।

८-१०-२०

## कशास्तव रचिल्या मीं कविता.

कशास्तव रचिल्या मीं कविता ।
प्रभु लीलेची दिसे विविधता ।
नित्य नवी चित्ता ।
म्हणुन मीं रचिल्या या कविता ।। धृ० ।।

उषःकाल मम जीवनिं झाला ।
ज्ञानरवी हळुं उदया आला ।
तम सगळा त्यानें दुरि नेला ।
दावियलें मज मंगल जगता ।। म्हणु० ।। १ ।

दिव्य भव्य भवनांची पहिली ।
पायरीच मीं ओलांडिली ।
नेत मजसि अंतरगाभारीं ।
देवि शारदा धरूनी हातां ।। म्हणु० ।। २ ।।

सृष्टिसतीचें रूप मनोहर ।
वसंतकाळीं नव यौवनभर ।
वर्षा ऋतु करि तिज ओलेती,
वाग्युद्धें माजलि ज्याकरितां ।। म्हणु० ।। ३ ।।

शरदाच्या चंदेरी रातीं ।
अमृत वर्षत शशि भूवरतीं ।
नेसुनि शालू जरिबुटयाचा ।
गालीं हांसे भासे वसुधा । म्हणु ० ।। ४ ।।

वर्षाकालीं सरिता दुथडीं ।
भरल्या, तुडविती पदिं तरूं वेली ।
मेघकाल क्षणभंगुर जाईल ।
पातक राहिल शेवटिं माथा । म्हणु० ॥ ५ ॥

धांवति कोठें झरझर निर्झर ।
कोकिळ कूजत आम्रतरूंवर ।
कुजबुजतें राईंत कुणितरी ।
नूतन प्रीतीची नव कविता । म्हणु ० ॥ ६ ॥

नादलुब्ध ही जीवनसृष्टी ।
वृक्षलता पवनासह डुलती ।
वंशसमुह स्वरसप्तक घुमवी ।
मुरलीधर जणूं गाई गीता । म्हणु ० ॥ ७ ॥

दुस्तर तरण्या हा भवसागर ।
नाखवाच तूं होइन मी तर ।
परतिर गांठायाची धडपड ।
रिझविन गाउन सागर गीता । म्हणु० ॥ ८ ॥

प्रीत शिशुंची प्रिय सुहृदांची ।
महती जननी कर्तव्याची ।
किंवा तगमग विरहिजनांची ।
तनु रोमांचित होई गातां । म्हणु० ॥ ९ ॥

अति दुःखाचे भीषण डोंगर ।
घोर निबिड कांतार भयंकर ।
क्रूर श्वापदें पथ हा दुष्कर ।
वाटाड्या कुणि संगें नसता । म्हणु० ॥ १० ॥

रंगि सुरंगी बाग जगाचा ।
जादुगार प्रभु माळी त्याचा ।
या पुष्पावर त्या पुष्पावर ।
रमलें मन फुलपांखरु उडता । म्हणु० ॥ ११ ॥

अष्टभाव मधु करुनी गोळा ।
मधु घट तो हृदयीं सांठविला ।
रसिक मधुपगण करि गुंजारव ।
तृप्त करो त्या, हीं मम कविता ॥ म्हणु०॥१२॥

२४-१-५३

(आर. पी. डी. कॉलेजच्या शारदा मंडळातर्फे झालेल्या कार्यक्रमांत म्हटलेली)

## म्हणुनि मी त्यजितें द्विजसदना

त्यजितें द्विजसदना, म्हणुनि मी त्यजितें द्विजसदना ॥ धृ० ॥

प्राशि अगस्तीमुनि मम ताता ।
पातहृदयीं तो भृगु दे लत्ता ।
म्हणुनि कोप येई मम चित्ता ।
होत न वश त्यांना । म्हणुनि० ॥ १ ॥

मम वैरिण जी सरस्वती तिज ।
बालपणापासुनि कीं हे द्विज ।
धारण करिती मुखविवरीं निज ।
दुःसह होत मना । म्हणुनि० ॥ २ ॥

उमाकांत पूजाया प्रतिदिनिं ।
विप्रवर्य ते खुडिती नलिनी ।
ऐशा परि मम गे हा छेदुनि ।
करिती अशी छलना । म्हणुनि० ॥ ३ ॥

लक्ष्मीच्या या ऐशा वचनीं ।
विस्मय गमतो खचित मन्मनीं ।
त्यजुं न शके कां त्रिभुवनजननी ।
विकारवश स्वमना । म्हणुनि० ॥ ४ ॥

१०-१२-२९

## हरिकीर्तनीं नाहीं प्रीती मना

( चाल–हर हर जन्मा आलें अशा )

हरिकीर्तनीं नाहीं प्रीती मना ।
धि:कार त्या मानवांच्या जिण्या ।। धृ० ।।
यशोदासुताच्या ।
पदपद्मि ज्यांची ।
भक्ती जडेना ।
ऐशा जनां ।। धि:कार० ।। १ ।।
गोपांगना प्रिय ।
गुणगानि त्याच्या ।
अनुरक्त जिव्हा ।
झालीच ना ।। धि:कार० ।। २ ।।
श्रीकृष्णलीला ।
परिसावया कर्ण ।
उत्सुक ज्यांचे ।
होतीच ना ।। धि:कार० ।। ३ ।।
धि:क् तान धि:क् तान ।
कीर्तनीं गर्जे ।
मृदंग धिक्कारि ।
तो त्या जना ।। धि:कार० ।। ४ ।।
धि:कार साहूं नका ।
घ्या प्रभूनाम ।
जना ही आनंदी ।
करी प्रार्थना ।। धि:कार० ।। ५ ।।

## उठी गोपाला भानुउदय झाला

उठी गोपाळा भानुउदय झाला ।
उभा गोप मेळा, धेनु ने वनाला ।। धृ० ।।
उठ लौकरी, मुखमार्जना करी ।
वंदि ईश श्रीहरी । नमुनि गुरुजनाला ।। उठी० ।। १ ।।
तुजसि आवडे, ताजि भाकरी ।
झणीं भोजना करी, घेइ नवनीताला ।। उठी० ।। २ ।।
चिमुकली तुझी, काठि घे करीं ।
स्कंधि धोंगडी बरी, बांध शिदोरीला ।। उठी० ।। ३ ।।
धेनुवत्स ही, ने वनांप्रती ।
घेइ बांसरी हातीं, रंजवी तयाला ।। उठी० ।। ४ ।।
बाळ संवगडे, घेउनी सवें ।
वना श्रीहरी निघें, धेनु चारण्याला ।। उठी० ।। ५ ।।
येश्वदे सती, अहा भाग्य तव किती ।
गृहीं नांदे श्रीपती, नोळखी तयाला ।। उठी० ।। ६ ।।

१-१०-२१

## वनवास सुखें भोगिन मीच अतां

(चाल–मधुर किती कुसुमगंध सुटला)

वनवास सुखें भोगिन मीच आतां ।
न करी माते कांहीं चिंता ॥ धृ ॥
नांद सुखें तूं निजपुत्रासह ।
देउनि राज्य भरता ॥ वन० ॥ १ ॥
मुक्त करी गे, निजवचनांतुनी ।
कैकयी मम ताता ॥ वन० ॥ २ ॥
आज्ञा ताता देई निघाया ।
मानि न दुःखव्यथा ॥ वन० ॥ ३ ॥
नेसायास्तव वल्कलें देई ।
कैकयी आणुन स्वतः ॥ वन० ॥ ४ ॥

५-४-२८

## वृंदावनिं हरि वाजवी पावा

वृंदावनिं हरि वाजवि पावा ।
आलापातें घेइ मधुरशा ।। धृ० ।।
सुस्वर गानें, भान हरपलें ।
भृंग रमे कमलांतरिं जैसा ।। आलापातें० ।।१।।
पति सुत गृह धन, सोडुनि ललना ।
वेष्टिति प्रभुला, तोडुनि पाशा ।। आलापातें० ।।२।।
बांसरि–नादें धेनु निवाल्या ।
व्याघ्रहि बनला, शीघ्र मुनीसा ।। आलापातें० ।।३।।
ब्रह्मानंदें स्थिरचर भरलें ।
आनंदी त्या याचित सु–रसा ।। आलापातें० ।।४।।

५–७–२

## हे सुभाष तव सू-भाष.

( चाल--प्रणतनाथ रक्षि कांत. )

हे सुभाष तव सू-भाष ।
भेदभाव करी निरास ।। धृ० ।।
स्वातंत्र्यदेवतेस ।
पूजाया जर्मविलेस ।
हे सुधीर हिंदवीर ।
देवोनी निज हकेस ।। हे सुभाष० ।। १ ।।
रुधिरजलें न्हाणियलें ।
जीवन तुज अर्पियलें ।
वाहुनि नररुंडमाल ।
पूजियलें कालिकेस ।। हें सुभाष० ।।२।।
कां प्रसन्न होसि न तूं ।
केला अति थोर क्रतू ।
दे आत्माहुति सुभाष ।
अजुनि न कां तोषलीस ।। हें सुभाष० ।।३।।

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
सं. नं. काव्य
१२२e
स्थळ प्रत

## तेथें मी वसतें

( शार्दूलविक्रीडित )

जेथें भोजन, दान, मान, अतिथी-अभ्यागता पूजन ।
सत्सेवा पितृदेवतार्चन जिथें गो, सत्य या पालन ।
धान्याचाहि असेच संग्रह जिथें, चित्तानुकूला प्रिया ।
तेथें मी वसतें प्रसन्नहृदयें लक्ष्मी वदे स्वप्रिया ॥ १ ॥

## शरण कुणा जाऊं

देवा शरण कुणा जाऊं । दीनदयाघन सद्गुरुराजा ।
सांग कुठें पाहुं ।। धृ० ।।
भवसागरिं या निराधार मी ।
पार कशी होऊं ।। देवा० ।। १ ।।
सखा सोयरा, तूंचि माझा ।
माय पिता भाऊ ।। देवा० ।। २ ।।
व्यापक असती, तूं जगदात्मा ।
भेट कशी घेऊं, न कळे ।। देवा० ।। ३ ।।
दृढभक्तीची कांस धरियली ।
दूर नको ठेवूं आतां ।। देवा० ।। ४ ।।

१२-७-५

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

## भूषवी गगन चंद्रमा अहा

(चाल-भारती सृष्टीचें सौंदर्य )

भूषवी गगन चंद्रमा अहा ।
वसुंधरेलाही हंसवित हा ॥ धृ० ॥
खेळावया आल्या देवबालिका ।
गगनांगणीं या, रम्य तारका ।
सुधाकरासंगें, लपंडाव या
लपती, छपती, खेळती पहा ॥ १ ॥
तैशा गृहांतुनी, रम्य बालिका ।
अंगणीं पातल्या, खेळायास का ?
सृष्टी हासे तैशी माऊली हांसे ।
आनंदी आनंद सर्वत्र भासे ॥ २ ॥

१३-१२-३५

[library stamp]

## प्रभुला वाहूं करूनी हार

चल तोडूं फुलें, चल तोडुं फुलें ।
सखये आला सुमन बहार ।
प्रभुला वाहूं करुनि हार ।। धृ ० ।।
मधुमालतिला, गडे शेवंतिला ।
बट मोगरिला । बघ सुमनांचा ये बहार ।। १ ।।
जाई जुई भरे, रातराणी डुले ।
निशिगंध फुले । संध्यासमयीं सुखवि फार ।। २।।
येई वसंत हा ऋतुराजा पहा ।
सृष्टिदेवी अहा । नेसली हिरवा शालु गार ।।३।।
बाग प्रभूजीचा । फुले बहारीचा
धनी पाहुं याचा । कोण ग बाई जादुगार ।।४।।

२३–११–४२

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. C0L8
संग्र. शाखा (स्थळ प्रत)

## मोहनमाळ कशाला

ही मोहनमाळ कशाला । घातलीस तूं माझिया गळा ।। धृ० ।।

सांज सकाळीं, ऐन दुपारीं ।
वाट पाहुनी, शिणलें दारीं ।
निराशाच परि, ये नशिबाला ।। मोहन० ।। १ ।।

आसनीं शयनीं भोजनीं मजला ।
वाटे स्वप्नीं बसास उशाला ।
ध्यास कशास्तव, हा लावियला ।। मोहन० ।। २ ।।

वीरवृत्ति कां जागृत झाली ।
प्रीतीची नच परवा उरली ।
समजूं काय मी, जासि रणाला ।। मोहन० ।। ३ ।।

असेन का मी तुझ्या अंतरीं ।
शंका ही मम हृदय विदारी ।
सांवरुं केवी अधिर मनाला ।। मोहन० ।। ४ ।।

त्या माळेचीं हीं स्मृतिसुमनें ।
ठेविन जपुनी, पूजिन त्यानें ।
हृदयिं अधिष्ठित तव मूर्तीला ।। मोहन० ।। ५ ।।

११-१०-४५

साहित्य-प्रेमी वाचकांसाठीं

## आमची 'कायम-ग्राहक' योजना

(१) रु. ३०० देऊन कुलकर्णी ग्रंथागारचे कायम-ग्राहक व्हा.

(२) आजपर्यंत प्रसिद्ध झालेलीं सुमारें चाळीस पुस्तकें (किंमत रु. १२५) व पुढें प्रसिद्ध होणारीं ललित साहित्य प्रकाशनाचीं सर्व पुस्तकें कायम ग्राहकांस विनामूल्य वंशपरंपरा मिळतील.

(३) रु. ३०० दर्शनी किंमतीचीं पुस्तकें कायम-ग्राहकास देण्यापूर्वी संस्था बंद झाली तर दिलेल्या पुस्तकांची दर्शनी किंमत वजा करून उरलेली रक्कम परत केली जाईल.

विशेष खुलाशासाठीं आजच लिहा—

**कुलकर्णी ग्रंथागार, १८६ शनवार, पुणें २.**



REFBK-0008084